cmyk

## संपादकीय

### राज्यपालांचे शेती प्रश्नांवर नेमके बोट

राहुरी कृषी विद्यापीठात मंगळवारी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत पदवीदान समारंभ पार पडला. या निमित्ताने राज्यपाल महोदयांनी मांडलेले विचार हे आजच्या शेती-उद्योगाचे नेमके दुखणे आणि त्यावर उपाय सुचवणारे आहे. एरवी शेतकऱ्यांच्या नावाने गळे काढले जातात. त्यांना भडकावून राजकीय भाकऱ्या भाजल्या जातात किंवा शेतकऱ्यांना जगाचा पोशिंदा वगैरे म्हणत त्याला लुटले जाते, अडवले जाते तो आणि त्याचा व्यवसाय कायम तोट्यात राहील अशी व्यवस्था आखली जाते. पण या पदवीदान समारंभात राज्यपालांनी प्रथमच शेतकऱ्यांच्या खऱ्या प्रश्नांना हात घालत सामुदायिक चिंतन घडवले आणि बळीराजाचे बळ वाढावे यासाठी उपाय सुचवले.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष -५ | अंक-०७ | शनिवार, दि.२६ एप्रिल २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

### १० हजार जवानांनी नक्षलवाद्यांना घेरले; निर्णायक मोहिम

**भोपाल :** केंद्रीय सुरक्षा दलांनी नक्षलवाद्यांविरोधात मोठी आघाडी उघडली आहे. हेलिकॉप्टर्स, ड्रोन, वैद्यकीय कर्मचारी आणि अत्याधुनिक युद्धतंत्रज्ञानाच्या सहाय्याने ही मोहीम राबवली जात आहे.

नक्षलवादाच्या मुळावर घाव घालणे, विशेषतः या भागात कॅम्प असलेल्या कुप्रसिद्ध पीएलजीए बटालियन क्रमांक १ च्या नेतृत्वाचा नायनाट करणे हा या मोहिमेचा उद्देश आहे. सुमारे १० हजारांहून अधिक जवानांनी सुमारे ५०० हून अधिक नक्षलवाद्यांना घेरले असून आत्तापर्यंतची अशी ही सर्वात मोठी मोहिम असल्याचे सांगितले जात आहे. या सुरक्षा दलातील जवानांसह छत्तीसगड, तेलंगणा, आंध्र प्रदेश येथील पोलिसांचाही या कारवाईत समावेश आहे.

# सत्यप्रत बियाण्यांची विक्री, वितरण आता साथी पोर्टलवरून

## राज्य सरकारने दिली मान्यता, शेतकऱ्यांची बोगस बियाणातून होणारी फसवणूक थांबणार

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यामध्ये सत्यप्रत बियाणे विक्री व वितरण साथी पोर्टलवरून करण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. २०२५ च्या खरीप हंगामापासून साथी पोर्टलवरून विक्री करता येणार आहे. शेतकऱ्यांना बनावट बियाणे देऊन फसवले जाते, त्यामुळे आता सत्यप्रत बियाणे विक्री आणि वितरण साथी पोर्टलवरून करण्याचा राज्य सरकारने निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारदेखील या पोर्टलवर सत्यप्रत बियाणे कार्यन्वित करण्याच्या प्रयत्नात आहे.**



मार्च महिन्यात प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत केंद्र सरकारकडून सत्यप्रत बियाणाचा साथी पोर्टलवर समावेश होईपर्यंत उद्योगाचा अभिप्राय लक्षात घेऊन सत्यप्रत बियाणे पोर्टलवरून विक्रीसाठी उपलब्ध करण्याची सूचना केली होती. तसेच मुख्यमंत्र्यांनी २० मार्च रोजी झालेया बैठकीत खरीप हंगामापासून सत्यप्रत बियाणे साथी पोर्टलवरून विक्री करण्याची सूचना दिली आहे. खरीप २०२३ पासून या पोर्टलवरून राज्य बीज प्रामाणिककरण यंत्रणेच्या माध्यमातून कार्यवाही सुरू आहे. यामध्ये बियाणे कंपन्यांचे पैदासकार, पायाभूत व प्रमाणित बिजोत्पादन कार्यक्रमाची प्रकिया केली जाते. तसेच खरीप २०२४ पासून कृषी विभागाच्या संनियंत्रणाने उत्पादित केलेल्या प्रमाणित बियाण्याचे वितरण याच पोर्टलवरून सुरू करण्यात आले. सत्यप्रत प्रामुख्याने खासगी बियाणे उत्पादक कंपन्यांकडून संशोधित केलेली वाणाचे बियाणे असतात. शेतकऱ्यांच्या एकूण बियाण्यात ७०-८० टक्के बियाणे सत्यप्रत असते. त्यामुळे या बियाणाची वितरण प्रणाली ट्रेसेबल करण्यास मदत साथी पोर्टलवरून होईल. तसेच उत्पादक ते शेतकरी यांच्यात प्रत्येक टप्प्यात नियंत्रण ठेवून पारदर्शकता वाढेल. बनावट, कालबाह्य आणि अनधिकृत बियाणे विक्रीस लगाम लागेल. तसेच शेतकऱ्यांना खात्रीशीर बियाणे उपलब्ध होईल. उत्पादक, वितरक आणि विक्रेते यांच्यात समन्वय निर्माण करून व्यवस्थापन करता येईल, असा दावा राज्य सरकारकडून करण्यात आला आहे. दरम्यान, साथी पोर्टलवरून वितरण आणि विक्रीची शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करणे, तसेच प्रसिध्दीच्या सूचना राज्य सरकारने कृषी आयुक्तालयाला केल्या आहेत. तर शेतकऱ्यांच्या तक्रारी दूर करण्यासाठी हेल्प डेस्क स्थापन करण्याची सूचना करण्यात आली आहे.

### सत्यप्रत बियाणे म्हणजे काय?

सत्यप्रत बियाणे म्हणजे शुद्ध आणि उच्च दर्जाची बियाणे. या बियाण्यासाठी उत्पादक कंपन्यांना गुणवत्तेचं प्रमाणीकरण करावे लागते. त्यासाठी सरकारने नियमावली निश्चित केलेली आहे. राज्य सरकारने सत्यप्रत बियाणे विक्रीसाठी साथी पोर्टलवरील उत्पादक, वितरण आणि विक्रेते यांची जबाबदारी स्पष्ट केली आहे. बियाणांच्या किमान गुणवत्तेच्या निकषांची पूर्तता करणे. बियाण्यांची उगवणक्षमता टक्केवारी, शुद्धता आणि आर्द्रता पातळी शासकीय निश्चित मानकांनुसार हवी. साथी पोर्टल अनुरूप सत्यप्रत बियाणांना योग्य लेबलिंग आवश्यक आहे.

# सोनिया गांधी, राहुल गांधींना नोटीस बजावण्यास न्यायालयाचा नकार

नवी दिल्ली । वृत्तसेवा

दिल्लीतील राऊस अव्हेन्यू न्यायालयाने शुक्रवारी नॅशनल हेराल्ड प्रकरणात काँग्रेस संसदीय पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि इतरांना सध्या नोटीस बजावण्यास नकार दिला. विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांनी या प्रकरणातील अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) याचिकेवर सुनावणी घेतली. यावेळी न्यायाधीशांनी ईडीला या प्रकरणाचे आणखी कागदपत्रे सादर करण्यास, दोष दूर करण्यास सांगितले आणि नोटीस बजावण्यास नकार दिला. पुढील सुनावणी २ मे रोजी होणार आहे.

आरोपींची बाजू ऐकल्याशिवाय नोटीस बजावू शकत नाही, असे न्यायाधीश गोगणे म्हणाले. ईडीने काही गहाळ असलेली कागदपत्रे जमा करावी. त्यानंतर सोनिया गांधी, राहुल गांधी आणि इतरांना नोटीस बजावण्याचा निर्णय घेऊ, असे न्यायाधीशांनी म्हटले आहे. दरम्यान, नॅशनल हेराल्ड वृत्तपत्र आणि असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड (एजेएल) यांच्याशी संबंधित कथित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात ईडीने १५ एप्रिल रोजी पहिले आरोपपत्र दाखल केले आहे.



**ईडीला या प्रकरणाचे आणखी कागदपत्रे सादर करण्याचे आदेश, पुढील सुनावणी २ मे रोजी**

यामध्ये काँग्रेस संसदीय पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, सॅम पित्रोदा आणि सुमन दुबे यांची नावे आहेत. २०१२ मध्ये भाजप नेते सुब्रमण्यम स्वामी यांनी सोनिया गांधी, राहुल गांधी आणि त्यांच्या सहयोगी कंपन्यांशी संबंधित लोकांविरुद्ध या प्रकरणाची तक्रार केली होती. त्यानंतर ईडीने १३ जून २०२२ रोजी राहुल गांधींची चौकशी केली होती.

# वक्फ कायद्याविरोधातील याचिका फेटाळा

## केंद्र सरकारची सर्वोच्च न्यायालयात मागणी, ब्लँकेट स्टे असू शकत नसल्याचा केला दावा

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

केंद्र सरकारने शुक्रवारी (२५ एप्रिल) सर्वोच्च न्यायालयाकडे वक्फ (सुधारणा) कायदा, २०२५ च्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिका फेटाळण्याची मागणी केली आणि सांगितले की कायद्यावर संवैधानिकतेची धारणा असल्याने त्यावर ''ब्लँकेट स्टे'' असू शकत नाही.

१,३३२ पानांच्या प्राथमिक प्रतिज्ञापत्रात, सरकारने वादग्रस्त कायद्याचा बचाव करताना म्हटले आहे की ''धक्कादायकपणे'' २०१३ नंतर, वक्फ जमिनीत २० लाख हेक्टर (२०,९२,०७२.५३६) पेक्षा जास्त वाढ झाली आहे. ''मुघल काळापूर्वी, स्वातंत्र्यपूर्व काळ आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडापूर्वी, भारतात एकूण १८,२९,१६३.८९६ एकर जमीन वक्फ



तयार केले गेले,'' असे प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे. खाजगी आणि सरकारी मालमत्तेवर अतिक्रमण करण्यासाठी पूर्वीच्या तरतुदींचा ''अहवाल गैरवापर'' झाल्याचा दावा केला आहे. अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयाचे सहसचिव शेरशा सी शेख मोहिद्दीन यांनी हे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. ''संवैधानिक न्यायालये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे वैधानिक तरतुदीला स्थगिती देणार नाहीत आणि या प्रकरणाचा अंतिम निर्णय घेतील अशी कायद्यातील स्थिती निश्चित केली आहे. संसदेने केलेल्या कायद्यांना लागू होणारी घटनात्मकतेची धारणा आहे,'' असे त्यात पुढे आले. केंद्राने पुढे म्हटले आहे की, ''हे न्यायालय खटल्यांची सुनावणी झाल्यावर या आव्हानांचे परीक्षण करेल, परंतु सामान्य प्रकरणांमध्ये (अगदी मुस्लिम समुदायाच्या सदस्यांवरही) अशा आदेशाचे प्रतिकूल परिणाम लक्षात न घेता ब्लँकेट स्टे (किंवा आंशिक मुक्काम) याचिका अयशस्वी ठरतील, ती सादर केली गेली आहे, विशेषत: अशा कायद्याच्या पूर्वसंधीच्या संदर्भात, ते सादर केले गेले आहे.'' प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिका खोट्या आधारावर चालवल्या गेल्या आहेत की सुधारणा धार्मिक स्वातंत्र्याचे मूलभूत ◀◀ पान २ वर

# आ. खोतकरांसह मुलाला जीवे मारण्याची धमकी

जालना । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार अर्जुन खोतकर आणि त्यांचे पुत्र अभिमन्यू खोतकर यांना सोशल मीडियावरून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. या संदर्भात अभिमन्यू खोतकर यांनी केलेल्या तक्रारीवरून जालना तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली आहे. तसेच अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

अधिक माहितीनुसार वेगवेगळे इन्स्टाग्राम अकाउंट वापरुन आमदार अर्जुन खोतकर आणि त्यांचे पुत्र अभिमन्यू खोतकर यांच्याविरुद्ध अश्लील शिवीगाळ करत त्यांना गोळ्या घालून जिवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. या घटनेमुळे जालना जिल्ह्यामध्ये एकच खळबळ उडाली आहे. या घटनेमध्ये वापरण्यात आलेल्या संबंधित इन्स्टाग्राम अकाउंटची सखोल चौकशी पोलिसांकडून करण्यात येत आहे. तसेच या अज्ञात व्यक्तीचा शोध देखील पोलिसांच्या वतीने सुरू करण्यात आला असल्याची माहिती पोलिस अधिकाऱ्यांनी दिली आहे.

# दहशतवादविरोधात सर्व पक्षीयांनी केंद्र सरकारच्या पाठीशी उभे राहावे - शरद पवार

**सावंतवाडी । प्रतिनिधी**

पहलगाम येथील पर्यटकांवरील दहशतवादी हल्ल्याविरोधात केंद्र सरकारने ठोस भूमिका घेऊन उत्तर द्यावे. या परिस्थितीत केंद्र सरकारच्या पाठीशी सर्व पक्षांनी उभे राहिले पाहिजे. त्यात कोणतेही राजकारण करू नये, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी शुक्रवार (दि.२५) व्यक्त केले. ते आंबोली येथील ऊस संशोधन केंद्रात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. ते पुढे म्हणाले की, दहशतवादविरोधात सर्वपक्षीयांनी सरकारसोबत राहिले पाहिजे. पण सरकारने एखादा निर्णय घेताना त्याचा भारतावरच उलटा परिणाम होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. यावेळी त्यांनी काही लोक धर्माबाबत अधिक बोलतात, त्यांनाच सरकार पाठिंबा देते, हे योग्य नसल्याचेही त्यांनी नमूद केले.



पहलगाममधील हल्ल्यानंतर केंद्र सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसकडून खासदार सुप्रिया सुळे उपस्थित होत्या. त्यामुळे, सरकार जो काही निर्णय घेईल, त्याला आमचा पाठिंबा असल्याचे पवार यांनी स्पष्ट केले. हल्ला भारतावर झालेला आहे, त्यामुळे सरकारला पाठिंबा देणे गरजेचे आहे. पण सरकारने पाकिस्तानला सडेतोड उत्तर द्यावे. एखादा निर्णय घेतला, तर तो तडीस न्यावा, असेही ते म्हणाले. केंद्र सरकारने पाकिस्तानवर काही निर्बंध लादले आहेत, पण हे निर्बंध लादत असताना सरकारने थोडासा विचार करावा, असे मत पवार यांनी व्यक्त केले. भारताची विमानसेवा जर पाकिस्तानातून जात असताना बंद केली, तर त्याचा परिणाम भारतावरच होईल. असे अनेक निर्णय आहेत. पण यातून पाकिस्तानलाही एक संदेश जाईल, असे ते म्हणाले.

# ठाकरे, पवार एकत्र येण्याची सध्या परिस्थिती नाही, देवेंद्र फडणवीस यांनी केला दावा

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यात शरद पवार व अजित पवार यांच्या भेटीगाठी वाढल्या आहेत. त्यातच राज ठाकरे व उद्धव ठाकरे यांच्या संभाव्य युतीची चर्चाही महाराष्ट्राच्या राजकारणात चांगलीच रंगली आहे. या प्रकरणी राजकीय वर्तुळात वेगवेगळे दावे-प्रतिदावे केले जात असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मात्र ठाकरे व पवार एकत्र येण्याची सध्या कोणतीही परिस्थिती नसल्याचा दावा केला आहे.**



मुख्यमंत्री फडणवीसांनी एका वृत्तवाहिनीला मुलाखत दिली. या मुलाखीत बोलताना ते म्हणाले, माझी पहिली भूमिका ही आहे की, कोणतेही कुटुंब एक होत असेल, तर आम्हाला त्याची कोणतीही अडचण नाही. त्यांनी जरूर एकत्रित यावे. आम्ही त्यांच्या एकत्र येण्याचे स्वागतच करू. दुसरी गोष्ट म्हणजे, माध्यमे फार जास्त ऐकतात. फार जास्त विचार करतात आणि त्यानंतर त्याचे फार जास्त संदर्भ काढतात. तुम्ही दोन वाक्यांमधील अर्थ काढण्याचे जे काम करता तो फार पुढचा विचार असतो. पण मी याविषयी स्पष्टपणे सांगतो. जे काही सुरू आहे, त्याविषयी मला सध्या तरी रिअलाईमेंटची कोणतीही परिस्थिती दिसत नाही. अर्थात साद आणि प्रतिसाद ज्यांनी दिला, असे तुम्ही म्हणत आहात, ते या याविषयी अधिक सांगू शकतील. मी त्यावर अधिक बोलणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे हा प्रश्न तुम्ही त्यांनाच विचारा, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२५ एप्रिल २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६२.५० क्विंटल | २,३०१ | २,८२० | २,५७० |
| ज्वारी/हायब्रिड : १६७.०० क्विंटल | १,७०१ | २,८११ | २,२६५ |
| मका/लोकल:५०.०० क्विंटल | २,००० | २,००० | २,००० |
| तूर : १६.०० क्विंटल | ६,००० | ६,६०० | ६,४४१ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ८४.०० क्विंटल | २,०३१ | २,७२२ | २,४२७ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: १०२.५० क्विंटल | ४,४०१ | ४,४४१ | ४,४२२ |
| हरभरा: २१.०० क्विंटल | ५,३३० | ६,६०० | ५,५२३ |

# झेंडा लावण्याच्या कारणावरून पोलीसांसमोरच तुफान राडा

## दोन गट आमने-सामने भिडले, एकमेकांची डोके फोडले

**आष्टी । प्रतिनिधी**

जिल्ह्यात दिवसेंदिवस गुन्हेगारीच्या घटना वाढताना दिसत आहेत. काही महिन्यापूर्वीच महाराष्ट्राला हादरवणारं संतोष देशमुख हत्याकांड घडलं. यानंतर गुन्हेगारीच्या विविध घटना समोर आल्या. त्यामुळे महाराष्ट्रात बीडची ओळख गुन्हेगारी जिल्हा म्हणून बनताना दिसत आहे.

आष्टी तालुक्यातील खडकत येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती २० एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात परंतु खडकत येथील एका चौकामध्ये निळा झेंडा लावल्याने काही लोकांनी त्यावर आक्षेप घेत विरोध केला, पोलिसांना व तहसीलदार याना या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी जाऊन दोन्ही झेंडे सन्मानपूर्वक काढण्यात परंतु अचानक झेंडा काढण्याच्या कारणावरुन



दोन गटात तुफान राडा झाल्याची घटना समोर आली आहे. बीडच्या आष्टी तालुक्यातील खडकत येथे दोन गट आपसात भिडले आहेत. जवळपास २५०-३०० तरुणांनी रस्त्यावर उतरुन एकमेकांच्या दिशेनं दगडफेक केली आहे. यावेळी काहींनी हातात लाकडी दांडे आणि इतर शस्त्र घेऊन दहशत माजवण्याचा देखील प्रयत्न केला. या संपूर्ण घटनेचा व्हिडीओ समोर आला असून सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या तुफान दगडफेकीत काहीजण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी आष्टीच्या खडकत गावातील एका चौकात झेंडा लावण्यावरुन वाद झाला होता. हा वाद झाल्यानंतर गुरुवारी दुपारी घटनास्थळी पोलीस दाखल झाले. पोलिसांनी संबंधित झेंडा चौकातून काढून टाकला. यावेळी दोन गटात तणाव निर्माण होऊन त्यांनी एकमेकांवर दगडफेक केली.

### पोलिसांनी एकतर्फी कारवाई करू नये - खडकत ग्रामस्थांची मागणी

**खडकत येथील मोठ्या प्रमाणावर सुरू असलेले गोवंश कत्तलखाने सध्या बंद असल्यामुळे नीलध्वजाचे निमित्ताने सामाजिक स्वास्थ्य बिघडण्याचे काम केले आहे. या प्रकरणाचा मास्टरमाईंड शोधून त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी आणि पोलिसांनी नेहमीप्रमाणे हिंदू समाजावर अन्याय न करता प्रत्यक्ष गुन्हेगार शोधावेत, अशी मागणी खडकत ग्रामस्थांनी केली आहे.**

गुरुवारी झालेल्या वादाचे पडसाद आज शुक्रवारी देखील बघायला मिळाले. दोन्ही बाजुने झालेल्या दगडफेकीमुळे गावात तणावाचं वातावरण निर्माण झालं आहे. ◀◀ पान २ वर

# इतिहास माहिती नसताना स्वातंत्र्य सैनिकांबाबत बोलू नका

**स्वा. सावरकर अवमान प्रकरणात सुप्रीम कोर्टाने राहुल गांधींना फटकारले**

नवी दिल्ली । वृत्तसेवा

स्वातंत्र्यवीर सावरकर अवमान प्रकरणात लोकसभा विरोधी पक्षनेते तथा राहुल गांधी यांच्याविरुद्ध लखनौ न्यायालयाने जारी केलेल्या समन्सला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली. सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधींना बेजबाबदार विधाने करू नका असा इशाराही दिला.

जर भविष्यात त्यांनी पुन्हा असे विधान केले तर न्यायालय त्या विधानाची दखल घेईल, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. न्यायालयाने म्हटले की, तुम्ही महाराष्ट्रात असे विधान केले. तिथे लोक त्यांची पूजा



करतात. तुमच्या आजीनेही सावरकरांचे कौतुक करणारे पत्र लिहिले होते. महात्मा गांधी जेव्हा ब्रिटीश अधिकाऱ्यांना पत्रे पाठवत असत तेव्हा ते लिहित असत, तुमचा विश्वासू सेवक. तर त्यामुळे तुम्ही महात्मा गांधींना इंग्रजांचे सेवक म्हणणार का? स्वातंत्र्यसैनिकांचा अपमान करणे चुकीचे आहे. सुमारे अडीच वर्षांपूर्वी राहुल गांधी यांनी अकोल्यात सावरकरांबद्दल एक विधान ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# राज्यपालांचे शेती प्रश्नांवर नेमके बोट

राहुरी कृषी विद्यापीठात मंगळवारी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत पदवीदान समारंभ पार पडला. या निमित्ताने राज्यपाल महोदयांनी मांडलेले विचार हे आजच्या शेती-उद्योगाचे नेमके दुखणे आणि त्यावर उपाय सुचवणारे आहे. एरवी शेतकऱ्यांच्या नावाने गळे काढले जातात. त्यांना भडकावून राजकीय भाकऱ्या भाजल्या जातात किंवा शेतकऱ्यांना जगाचा पोशिंदा वगैरे म्हणत त्याला लुटले जाते, अडवले जाते तो आणि त्याचा व्यवसाय कायम तोट्यात राहील अशी व्यवस्था आखली जाते. पण या पदवीदान समारंभात राज्यपालांनी प्रथमच शेतकऱ्यांच्या खऱ्या प्रश्नांना हात घालत सामुदायिक चिंतन घडवले आणि बळीराजाचे बळ वाढावे यासाठी उपाय सुचवले. पदवी घेऊन बाहेर पडणारे विद्यार्थी आणि शासन, संशोधक यावर किती गंभीरपणे काम करतात हे काळच ठरवेल पण राज्यपालांनी योग्य दिशा दाखवत शेतकरी व शेती प्रश्नावर बोट ठेवले आहे.

अलीकडे कृषी विद्यापीठाची पदवी ही मुलांइतकीच मुली घेतांना दिसत आहेत ही आनंदाची बाब असली तरी पदवी घेणारे विद्यार्थी हे शेतीत करिअर करण्याऐवजी स्पर्धा परीक्षा आणि सरकारी नोकरी याकडेच अधिक संख्येने वळताना दिसत आहेत. स्पर्धापरीक्षांचा अभ्यासक्रम हा कृषी प्रश्नांना प्राधान्य देणारा आहे असे सांगितले जाते. ओघानेच शहरी स्पर्धक मागे पडतात आणि ग्रामीण व कृषी अभ्यासक विद्यार्थ्यांना प्रशासकीय अधिकारी म्हणून संधी मिळते. एकीकडे ही गोष्ट चांगली म्हणावी तर जे शिक्षण घेतले त्यांचा प्रत्यक्ष शेतीत किंवा शेतकऱ्यांना उपयोग होताना दिसत नाही, हे दुर्देवी आहे. काही अपवाद आहेत पण शेतीचा आवाका, विस्तार, प्रश्न, हवामान समस्या, होत असलेले बदल विचारात घेता हे प्रमाण नगण्य आहे. कृषी पदवीधर शेतीत रमत नाहीत याचे खरं कारण शेती फायद्यात नाही हेच आहे. हे चक्र थांबले पाहिजे. पुन्हा उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी अशी रचना झाली पाहिजे पण शेतकरी कायम कर्जात, कर्जमाफीत कधी अवर्षण, कधी ढगफुटी, कधी दर नाही तर कधी काय पण यावर उपाय आहेत हे राज्यपालांनी स्पष्ट केले. ते केवळ भाषण करून गेले नाहीत. त्यांनी राहुरीत महात्मा फुले कृषी विद्यापीठात तीन दिवस मुक्काम ठोकला. विद्यापीठाचे काम, अडचणी समजून घेतल्या. आता सरकारला ते काय सूचवतात आणि सरकार त्यांचे काय ऐकते, हे बघायचे. पण मुळापासून प्रारंभ झाला आहे हे आनंदाचे आहे.

'कृषी विद्यापीठांनी हवामान बदलांना तोंड देणाऱ्या पिकांच्या जाती विकसीत कराव्यात, तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन व डिजिटल तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेतकऱ्यांना योग्य वेळी आवश्यक माहिती पुरवावी, कृषी प्रक्रिया उद्योगाला प्रोत्साहन आणि कृषी मूल्यसाखळी विकसित करणे महत्त्वाचे आहे', असे सांगत राज्यपालांनी, वाढता उत्पादन खर्च, मर्यादित बाजारपेठ प्रवेश आणि अपुरी भावनिश्चिती प्रणाली यामुळे कृषी क्षेत्र अडचणीत येत असताना भारतीय शेतीला शाश्वत, आर्थिक लाभाची आणि भविष्यासाठी सक्षम व्यवसायात रूपांतरित करण्यासाठी कृषी विद्यापीठांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे, यावर जोर दिला. अधिक उत्पन्न देणारी आणि पोषणमूल्यांनी भरलेली पिके विकसित करणे हे कुपोषणाला थोपवण्यासाठी, अन्न व पोषण सुरक्षा देण्यासाठी अत्यावश्यक आहे. नवोपक्रम, शिक्षण आणि शाश्वत पद्धतींच्या माध्यमातून भारतीय शेती अडचणींवर मात करून यशस्वी होऊ शकते. कृषी पदवीधरांनी विज्ञान-तंत्रज्ञानाच्या साह्याने या आव्हानांना सामोरे जाऊन आधुनिक कृषी पद्धती विकसित करावी. असे त्यांचे सांगणे मोलाचे होते. यावेळी निर्यात, प्रक्रिया, ब्रँडींग, नवे तंत्रज्ञान, कमी खर्चात अधिक उत्पादन, नवीन जाती, हवामानातील बदलांवर मात करण्यासाठी उपाय, शेतीतील यांत्रिकीकरण, कृषी मॉल, विविध आऊटलेट यावर चर्चा झाली. या विद्यापीठाने संशोधनात आजवर मोठी कामगिरी केलेली आहे, भुईमुग, सोयाबीन ज्वारी, तेलबिया, नारळ व अन्य फळे यामध्ये नवे वाण आणले आहेत पण शेतकऱ्यांना व्यापक प्रमाणात उत्तम बी बियाणे उपलब्ध होताना दिसत नाही. ओघानेच एकरी उत्पादन घटत आहे. विद्यापिठाचे हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत नेमकेपणाने पोहचत नाही ही खंत आहे. आपला देश आणि महाराष्ट्र कृषीप्रधान आहे पण गावे ओस पडून महानगरे बकालपणे वाढत आहेत हे चित्र थांबायला हवे. किमान शंभर एकरामागे एक कृषी पदवीधर असला पाहिजे व त्याने शेती विकसित केली पाहिजे. साखर कारखान्यांनी एक हजार एकरामागे एक कृषी अधिकारी नेमला पाहिजे व त्याला एकरी शंभर टन उसाचे टार्गेट दिले पाहिजे. किती ऊस गाळला आणि किती कारखाने गिळले यावर सहकार नेत्यांचे मूल्यमापन न होता एकरी किती टन ऊस पिकला यावर ते झाले पाहिजे पण तसे ते होत नाही. राज्यपालांनी योग्य चिंतन केले आहे. आता त्यावर कार्यवाही गरजेची आहे. यंदाचा खरीप हंगाम तोंडावर आहे. शासनाने उत्तम फौंडेशनचे किंवा प्रथम जर्मिनेशनचे बी, योग्य खते, औषधे, तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचवावे आणि हमी भाव द्यावा. शेतकरी देशाला अव्वल स्थानी केल्याशिवाय राहणार नाहीत. राज्यपालांनी हा एक विषय लावून धरला तरी खूप मोठे काम होईल. शेतकरी सुखी तर जग सुखी हेच खरे.

# खळबळजनक! नगर परिषद बीडची अनोखी अट पाण्याच्या टँकरसाठी लागणार माजी नगरसेवकाचे पत्र

## नगरपरिषदेवर प्रशासक असताना माजी नगरसेवकाची आवश्यकता काय -अजय सरवदे

बीड । प्रतिनिधी

माजी नगरसेवकांनी पत्र दिले तरच त्या भागातील लोकांना पाणी मिळणार अशी नवीन अट नगर परिषद बीड यांनी तयार केली आहे. विस्तृत माहिती अशी की, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी बीड शहराला आठ दिवसाला पाणीपुरवठा व्हावा यासाठी तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना नगरपरिषद बीड यांना देण्यात आल्या होत्या त्या अनुषंगाने माजलगाव बॅक वॉटरच्या पाणी संदर्भात विशेष स्तरावर काम सुरू आहे हे काम जानेवारीच्या एडिंगलाच होणे महत्त्वाचे होते परंतु ऐन पाण्याची गरज असताना मे महिन्यामध्ये पाईपलाईनचे काम सुरू केल्याने बीड शहरामध्ये गेल्या वीस दिवसापासून पाण्याची तीव्र टंचाई सुरू आहे.



यामध्ये नगरपरिषद बीडवर प्रशासक असून काही स्वार्थी माजी नगरसेवकांनी नगरपालिकेला पत्र देऊन आमचे पत्र आल्याशिवाय पाण्याचे टँकर पाठवू नये अशी अट टाकल्याने पाण्यासाठी माजी नगरसेवकापुढे विनवणी करून टँकर मागवावे लागत आहे. बीड शहरातील काही माजी नगरसेवक हे आपापल्या वार्डातील नागरिकांना पत्राच्या माध्यमातून वेठीस धरण्याचे काम करत असल्याचे दिसून आले आहे.

नगरपरिषद बीड प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी कविता जाधव व मुख्याधिकारी नीता अंधारे यांचे दुर्लक्ष होत आहे. त्यांच्या अधिनस्त काम करणारे नगर परिषद बीडमधील अधिकारीकर्मचारी यांच्यावर कसल्याही प्रकारचे नियंत्रण नसल्याचे दिसून आले आहे. मनाला येईल तश्या नियम अटी लादून पाण्यासाठी वेठीस धरले जात आहे.

शहरातील नागरिकांना पाण्याच्या टँकरसाठी माजी नगरसेवकाच्या पत्राची अट त्वरित रद्द करावी असे न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात अशा आशयाचे निवेदन मा. जिल्हाधिकारी बीड, नगर परिषद प्रशासक बीड यांना देण्यात आले आहे.

# मध्यप्रदेश आणि मुंबईतील घटनेचा जैन बांधवांकडून जाहीर निषेध

बीड । प्रतिनिधी

मध्यप्रदेश आणि मुंबईतील घटनेचा बीडमधील जैन बांधवांकडून जाहीर निषेध करण्यात आला आहे. त्याअनुषंगानेच मध्यप्रदेश येथे जैन मुनींना मारहाण केलेल्या आरोपींवर आणि मुंबई येथील जैन मंदिर पाडणार्या अधिकार्यांवर कडक कारवाई करा तसेच पाडलेले मंदिर पुन्हा उभे करा, अशी मागणी बीडमधील जैन बांधवांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यामार्फत शासनाकडे केली आहे.



## जैन मुनींना मारहाण केलेल्या आरोपींवर तर जैन मंदिर पाडणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करा

### जैन बांधवांची जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाकडे मागणी

मध्यप्रदेश येथे जैन मुनींना झालेल्या मारहाणीचा व मुंबई विलेपार्ले येथील जैन मंदिर महापालिकेने पाडलेल्या घटनेचा बीडमधील जैन बांधवांकडून जाहीर निषेध करण्यात आला आहे. या दोन्ही घटना जैन समुदायासाठी अत्यंत खेदजनक आहेत. त्याअनुषंगानेच मध्यप्रदेश येथे जैन मुनींना मारहाण केलेल्या आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, तसेच मुंबई महापालिका अधिकार्यांनी विलेपार्ले येथील ३० वर्षांपुर्वीचे जैन मंदिर पाडून तेथील मंदिरातील मुर्तींची विटंबना केली आहे, सदरील विटंबना करण्यात येणार्या सर्व अधिकार्यांना निलंबित करावे, त्यांची चौकशी करून त्यांना बडतर्फ करावे, महाराष्ट्र शासनाने ही बाब गंभीरतेने घ्यावी, तसेच तेथील जैन मंदिर पुन्हा उभारण्यासाठी शासनाने कार्यवाही करावी, अशी मागणी श्री. ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फ्रेस आणि सकल जैन समाज बीडच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना गुरूवारी लेखी स्वरूपात निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनावर दै. लोकाशाचे संपादक विजयराज बंब, अशोक लोढा, ललित अब्बड, मदन दुग्गड, सुशिल खिवंसरा, चेतन अब्बड, गौतम खटोड, अनिल काला, आशिष जैन, उज्वल कोटेचा, किशोर पगारीया, सुभाष जैन, संजय जैन, नरेंद्र महाजन, सतिष कोटेचा

## पान ६ वरून...

### अधिकाऱ्यांचा सत्कार

माहिती घेतली पाहिजे.

आमच्या बोलण्याचा अनेकांना राग येईल. मात्र आम्ही सार्वजनिक रित्या सर्वांना बोलत नाहीत. तर गुन्हेगारी प्रवृत्तीच्या अनेक लोकांनी सत्काराच्या माध्यमातून अनेकांना फसवल्याचे स्पष्ट झालेले आहे. त्यामुळे अशा गुन्हेगारांना अधिकाऱ्यांनी रोखले पाहिजे. म्हणून आम्ही या विषयावर बोलत आहोत.

यात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा असा की, अधिकारी सामान्य माणूस म्हणजेच साधारण कपडे घालून आलेला माणूस सत्कारासाठी आल्यानंतर उठत नाहीत. पांढरे शुभ्र कपडे असलेल्या माणसांसाठी ते उठून सत्कारासाठी सज्ज होतात. हा देखील सामान्य जनतेच्या मनावर आघात करणारा एक प्रश्न आहे. त्यामुळे सामान्य जनतेने देखील सत्काराला जाण्याची आवश्यकता नाही.

वास्तविक पाहता सेवा नियमाप्रमाणे काम करत असताना पन्नास रुपयांच्या वरील कोणतीही वस्तू भेट घेत असताना ती शासनाला कळवणे गरजेचे आहे. या वस्तूंमध्ये सत्काराचे साहित्य वगळून, असे लिहिलेले नाही. आम्ही अनेक अधिकारी सत्कार स्वीकारत नाहीत, हे पाहिलेले आहे. त्यामुळे दोनशे, पाचशे आणि हजार रुपयांचा बुके तुम्ही कसा स्वीकारता ? हा देखील प्रश्न उपस्थित होतो. त्यामुळे जनतेला आमचे आवाहन आहे की, अधिकाऱ्यांचा सत्कार करू नका. प्रायोगिक पातळीवर बदलून जाणारा अधिकारी नवीन अधिकाऱ्याचा प्रातिनिधिक स्वरूपात सत्कार करत असतो. तोच सत्कार जिल्हा वासियांतर्फे झाल्याचे समजले जावे. अधिकाऱ्यांनी देखील आपल्या सत्कारावर बंधन आणावे, असेही ॲड. अजित देशमुख यांनी म्हटले आहे.

### कोडींग कोर्स गुणवत्ताधारक

वापर वाढायला हवा असे आदित्य जीवने बक्षीस वितरण प्रसंगी बोलताना म्हणाले. डॉ. विठ्ठल जाधव हे तीस वर्षांहून अधिक काळ जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. बालसाहित्य विषयात पीएच.डी पदवी प्राप्त असून त्यांच्या 'पांढरा कावळा' या बालकादंबरीस महाराष्ट्र शासनाचा साने गुरुजी राज्यस्तरीय उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती पुरस्कार (२०१२) लाभला आहे. बटाटीची धार (बाल कथासंग्रह), तिवढा, रानरांगूळ हे कथासंग्रह, गर्भकळा कवितासंग्रह, उंदरीन सुंदरीन आणि अटर का पटर हे दोन बालकविता संग्रह प्रकाशित आहेत. यासह मानवता व्हाऊचर लेखसंग्रह, एकविसाव्या शतकारंभीचे बालसाहित्य हा संशोधनपर समीक्षा ग्रंथ अशी दहा पुस्तके प्रसिद्ध आहेत. बालकुमार साहित्य संमेलन, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, नियतकालिके, आकाशवाणीवर साहित्य लेखनास स्थान मिळाले आहे. मसापच्या प्रतिष्ठान नियतकालिक संपादक मंडळात ते कार्यरत आहेत.

या यशाबद्दल शिरूर तालुक्यातील शिक्षकांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. दरम्यान तालुक्यातील प्रदीप दुधाळ यांना लॅपटॉप आणि गणेश शिंदे, किशोर सुपेकर, रामदास पाखरे, श्रीमंत तळेकर, अशोक सप्रे, स्वाती राऊत, संगीता वारे, संध्या कुलकर्णी या शिक्षकांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यशस्वीतांचे गटशिक्षणाधिकारी प्रशांत शिंदे, जमीर शेख यांनी स्वागत केले आहे.

### बडतर्फ पोलीस उप निरीक्षक

आणि खोटे आरोप केले. तसेच पोलीस खात्याच्या सेवाशर्ती, नियमावलीचा भंग करून पोलीस खात्याला काळीमा फासण्याचे दुष्कृत केल्याप्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत का व यांच्या अहवालावरून संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांनी नुकतेच निलंबित केले आहे. बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक कासले यांच्या कृत्याची झळ बीड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातील सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक डी.बी. गात यांना बसली. कनिष्ठ अधिकाऱ्याने केलेले दुष्कृत्य हे वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती कसे झाले नाही? तसेच आपल्या अधिकाऱ्यावर नियंत्रण नसणे व कर्तव्यास कसूर केल्या प्रकरणी डी. बी. गात यांना दोषी धरून नियंत्रण कक्षाला संलग्न करण्यात आले आहे.

गाथे चांगले अधिकारी असले तरी असले प्रकरणात विनाकारण त्यांना झळ पोचली आहे. दरम्यान सायबर सेलचा तात्पुरता कार्यभार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शेख उस्मान यांच्याकडे देण्यात आला आहे.

## पान १ वरून...

### इतिहास माहिती नसताना

केले होते. त्यावेळी ते काँग्रेसच्या भारत जोडो यात्रेत होते आणि ही यात्रा महाराष्ट्रातून जात होती. १७ डिसेंबर २०२२ रोजी ते महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्यात होते. येथे त्यांनी सावरकरांचा उल्लेख ब्रिटिशांचा सेवक असा केला होता ज्यांना ब्रिटिश सरकारकडून पेन्शन मिळत असे. राहुल गांधींच्या वकिलाने सर्वोच्च न्यायालयात सांगितले की, त्यांच्या अशिलाचा कोणालाही चिथावणी देण्याचा हेतू नव्हता. यावर न्यायालयाने म्हटले की, जर त्यांना कोणालाही चिथावणी द्यायची नव्हती तर त्यांनी अशी विधाने का केली. स्वातंत्र्यसैनिकांबद्दल खोटी विधाने करण्याचा अधिकार कोणालाही नाही, असा सक्त सल्ला न्यायालयाने राहुल गांधींना दिला आहे. त्यांनी राहुल गांधींना सांगितले की ते राजकारणी आहेत, मग ते अशी विधाने का करतात, असे करू नका.

**तर आम्ही स्वतःहून दखल घेऊ**

लखनौ न्यायालयाने जारी केलेल्या समन्सला स्थगिती देताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, आम्ही हे स्पष्ट करत आहोत की जर अशी विधाने पुन्हा केली गेली तर आम्ही स्वतःहून दखल घेऊ. स्वातंत्र्यसैनिकांवर भाष्य करण्याचा अधिकार कोणालाही नाही. वकील नृपेंद्र पांडे यांनी तक्रार दाखल केली होती आणि आरोप केला होता की राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रेदरम्यान वीर सावरकरांचा जाणूनबुजून अपमान करण्याच्या उद्देशाने हे विधान केले होते. ते म्हणाले की, राहुल गांधी यांचे हे विधान वीर सावरकरांचा अपमान करण्याच्या सुनियोजित कटाचा भाग आहे.

### वक्फ कायद्याविरोधातील

अधिकार काढून घेतात. त्यात म्हटले आहे की न्यायालय कायद्याची क्षमता आणि घटनेच्या कलम ३२ अंतर्गत मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करण्याच्या आधारावर कायद्याचे पुनरावलोकन करू शकते. प्रमुख राजकीय पक्षांचे सदस्य असलेल्या संसदीय समितीने अतिशय व्यापक, सखोल आणि विश्लेषणात्मक अभ्यास केल्यानंतर या सुधारणा करण्यात आल्याचे सरकारने म्हटले आहे. सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठ ५ मे रोजी अंतरिम आदेश देणार आहे.

### झेंडा लावण्याच्या

या दगडफेकीमध्ये महिलांनाही मार लागला असून, दलित वस्तीवर गावातल्या व इतरच्या आसपासच्या गावातील लोकांनी दगडफेक करत महिला सह मुलांना देखील मारहाण केल्याची माहिती मिळत आहे. सध्या परिस्थिती तणावपूर्ण आहे. वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी खडकत येथे जाऊन समाज बांधवांना शांत राहण्याचे आवाहन करत, जे विद्यार्थी युवक या दगडफेकीत किंवा भांडणांमध्ये सामील नव्हते तरी त्यांना पोलीस ताब्यात घेतल्याचा आरोप केला आहे.

# लाभार्थ्यांनी ट्रॅक्टर विकल्यास किंवा गहाण ठेवल्यास गुन्हा दाखल होणार

जालना । प्रतिनिधी

दुर्बल घटकांच्या विकासासाठी शासनाच्या सामाजिक न्याय विभागाकडून विविध योजना राबविण्यात येत असतात. त्याचाच एक भाग म्हणून अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना उत्पन्नाचे साधन उपलब्ध व्हावे व त्यांच्या राहणीमानात बदल होवून सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने पुरवठा करण्याची शासनाची योजना आहे. या योजनेद्वारे १५ अश्वशक्तीचे मिनी ट्रॅक्टर, दीड टन भार क्षमतेचे नॉन टिपींग ट्रेलर व ०.८ मी. रोटाव्हेटर ९० टक्के अनुदानावर पुरविण्यात येत असतो.

स्वयंसहाय्यता बचतगटाची नोंदणी महिला आर्थिक विकास महामंडळ, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, कृषी विभागाच्या कार्यालयाकडून झालेली असावी. बचत गट चालु स्थितीतअसून नियमित आर्थिक व्यवहाराच्या नोंदीचा अभिलेख व पासबुक असणे आवश्यक आहे. मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांची कमाल किंमत ३ लक्ष ५० हजार रुपये इतकी आहे. त्यामध्ये ९० टक्के अनुदान म्हणजे ३ लाख १५ हजार रुपये शासकीय अनुदान आणि स्वयंसहाय्यता बचतगटाचा हिस्सा १० टक्के म्हणजेच ३५ हजार रुपये इतका असेल. लाभार्थी स्वयंसहाय्यता बचत गटांना अनुज्ञेय असणाऱ्या किमान ९ ते १८ अश्वशक्तीपेक्षा जास्त अश्वशक्तीचा ट्रॅक्टर व त्याची उपसाधने खरेदी करता येतील. मात्र त्याची कमाल किंमत शासकीय अनुदानापेक्षा जास्त असल्यास कमाल अनुज्ञेय अनुदानाव्यतिरीक्त जादाची रक्कम बचतगटांनी स्वत: खर्च करावी लागेल. समाज कल्याण विभागाकडून या योजनेअंतर्गत लाभार्थी बचत गटाची निवड झाल्यानंतर बचत गटाने निर्धारित केलेल्या प्रमाणकानूसार मान्यताप्राप्त उत्पादकांकडून मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने शासनाने निर्धारित केलेल्या किंमतीपर्यंत खरेदी करावीत. स्वयंसहाय्यता बचत गटाने मिनी ट्रॅक्टर व उपसाधने खरेदी केल्याची पावती सादर केल्यानंतर व खातरजमा करुन लाभार्थी बचत गटाला शासकीय अनुदानाचा ५० टक्के अनुदान मिनी ट्रॅक्टर व त्याचीउपसाधने उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे नोंद केल्याचे पुरावे सादर केल्यास १०० टक्के अनुदान स्वयंसहाय्यता बचत गटाच्या बँक खात्यात जमा करण्यात येतो.

स्वयंसहाय्यता बचत गटातील सदस्यांनी या अगोदर पॉवर टिलर योजनेचा लाभ घेतलेला नसावा. स्वयंसहाय्यता बचतगटाचे आर्थिक उत्पन्न वाढावे या हेतूने शासनाकडून मिनी ट्रॅक्टर योजना आहे. याबाबतची जाणीव लाभार्थी गटास आहे. त्यामुळे मिळालेला मिनी ट्रॅक्टर विकल्यास किंवा गहाण ठेवल्यास सदर व्यवहार बेकायदेशीर ठरवून स्वयंसहाय्यता बचतगटावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल तसेच स्वयंसहाय्यता बचतगटाकडून शासनाने मिनी ट्रॅक्टरच्या खरेदीसाठी खर्च केलेली संपूर्ण रक्कम वसुल करण्यात येईल आणि शासनाचे अन्य योजनांचा लाभ घेण्यास किमान ५ वर्ष अपात्र ठरविले जाईल.

# बीडचा अभिमान! शेतकरी पुत्र अक्षय मुंडेंचे यूपीएससीतील यशानंतर गावात स्वागत!

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील पांगरी या छोट्याशा गावातील सामान्य शेतकरी कुटुंबातील सुपुत्र डॉ. अक्षय संभाजी मुंडे यांनी यूपीएससी परीक्षेत यश मिळवून गावाचे नाव उज्ज्वल केले. २४ एप्रिल गुरुवारी रात्री त्यांचे पांगरी येथे आगमन झाल्यानंतर ग्रामस्थांनी भव्य मिरवणुकीद्वारे त्यांचे उत्साहात स्वागत केले.

डॉ. मुंडे दिल्लीहून रात्री आठ वाजता पांगरीत पोहोचले. गावात आल्यावर त्यांनी सर्वप्रथम आपल्या आई इंदुबाई मुंडे आणि वडीलधाऱ्यांचे आशीर्वाद घेतले. त्यानंतर गोपीनाथ गडावर जाऊन लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या समाधीस्थळाला अभिवादन केले. गावकऱ्यांनी आपापसात वर्गणी गोळा करून त्यांच्या स्वागतासाठी मिरवणुकीचे आयोजन केले. गोपीनाथ गड ते पांगरी कॅम्पपर्यंत उघड्या जीपमधून ढोल-ताशांच्या गजरात आणि पुष्पवृष्टीत मिरवणूक



काढण्यात आली. श्री हनुमान मंदिरात झालेल्या कार्यक्रमात त्यांचा सत्कार करण्यात आला.या वेळी व्यासपीठावर त्यांच्या आई इंदुबाई मुंडे उपस्थित होत्या. ॲड. श्रीनिवास मुंडे, ज्ञानोबा मुंडे पाटील, विनायक मुंडे, श्रीकांत तिडके, दत्तात्रय तिडके, महादेव मुंडे, सुमंत पांचांगे, माणिक मुंडे, किशन मुंडे, वसंतराव तिडके, गोविंद मुंडे, नंदकिशोर मुंडे, अभिमान मुंडे, डॉ. संतोष मुंडे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ, तरुण वर्ग उपस्थित होते.

''गावकऱ्यांनी माझे जसे स्वागत केले, तसंच त्यांना गरज भासेल तेव्हा मीही त्यांच्या मदतीला तत्पर असेन,'' असे भावनिक उद्गार डॉ. अक्षय मुंडे यांनी काढले. त्यांनी सांगितले की, सहा प्रयत्नांनंतर स्वतःच्या मेहनतीवर हे यश संपादन केले. कोणत्याही कोचिंग क्लासशिवाय अभ्यास केला. आर्थिक अडचणींमुळे काही क्लासेसमध्ये बसता आलं नाही. तरीही प्रयत्न सुरू ठेवले. ''यशानंतर एका कोचिंग क्लासेसनी माझा फोटो लावला, पण मी त्यांना विनंती केली की फोटो काढा, कारण चुकीचा संदेश जाऊ नये. आणि स्वतःच्या अभ्यासावर विश्वास ठेवूनही यश मिळवता येते,'' असेही त्यांनी नमूद केले.

### आईने शेतीत कष्ट करून मुलांना शिकवले

डॉ. अक्षय यांनी डेंटिस्ट म्हणून काही काळ सेवा केली आणि शिष्यवृत्ती मिळवून पुढील शिक्षण पूर्ण केले. आईने शेतीत कष्ट करून त्यांना शिकवले. त्यांच्या यशात बहिणी अक्षता हिचेही मोठे योगदान आहे. ''अक्षयने फोन करून 'आई, मी यूपीएससीत पास झालो' असे सांगितले, तेव्हा माझ्या डोळ्यातून आनंदाश्रू आले,'' असे इंदुबाई मुंडे भावूकपणे म्हणाल्या. ''पांगरी गावाचा डॉ. अक्षयमुळे अभिमान वाढला आहे,'' असे मत ॲड. श्रीनिवास मुंडे यांनी व्यक्त केले.

cmyk

## शासकीय कामात अडथळा तिघा विरुद्ध गुन्हा दाखल

पाटोदा । प्रतिनिधी

तहसील कार्यालयात हलगी वाजून शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याबद्दल नायब तहसीलदार अभय राजाभाऊ जोशी यांच्या फिर्यादीवरून पाटोदा पोलीस ठाण्यात दिगाविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली आहे याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की गुरुवार दिनांक २४ एप्रिल रोजी सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास अभय जोशी तहसील कार्यालयात पाटोदा येथील दालनात कार्यालयीन कामकाज करत असताना त्यांना अचानक वर्षा मजल्यावर हलगी वाजवण्याचा आवाज आलेले ते लगेच त्यांचे दानातून वरच्या मजल्याकडे येशील दार पाठवता यांच्या कार्यालयाकडे गेले असत तेथे तहसीलदार यांचे कार्यालय समोर ते ओळखत असलेल्या किशोर भीमराव राख व इतर तीन अनोळखी इसम उभे होते व किशोर राखा इतर तीन लोकांना हलगी वाजवण्याची सांगत होता व ते लोक तिथून हलगी वाजून शासकीय कामात अडथळा आणत होते यावेळी मी तहसीलदार डीबी निळवाड साहेब व ते स्वतः इतर कारणातून स्टाफ व बंदोबस्तरीतील पोलीस त्यांना तुम्ही हलगी वाजू नका असे समजावून सांगितले होते परंतु त्यांनी काही ऐकले नाही व किशोर राखी यांच्या सांगण्यावरून तीन अणु केस मध्ये शासकीय कार्यासंबंधी वाजून शासकीय कामात १८ निर्माण केला म्हणून त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात संदर्भात पाटोदा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

३

शनिवार दि.२६ एप्रिल २०२५

# वाढत्या उन्हाचा फटका, सर्वत्र शुकशुकाट, व्यवहारही थंडावले

अंबाजोगाई– प्रतिनिधी

सध्या दररोज उन्हाचा तडाखा वाढत असल्याने याचा फटका मोठया प्रमाणात दिसत असून शहरातील आठवडी बाजारासह इतरत्र झाला आहे. ग्राहकच नसल्याने अर्थचक्र कोलमडल्याची भिती असून याचा अर्थिक फटका उत्पादक व शेतकऱ्यांना बसत आहे. सध्या अंबाजोगाई व परिसरात तापमानात वाढ होऊन उष्णतेची लाट निर्माण झाल्याने महिला, लहान मुले, शाळकरी विद्यार्थी, नागरिक, शेतकरी, भाजीपाला विक्रेते आदी हवालदिल झाले आहेत तापमान भरपुर वाढले आहे. या वाढत्या उष्णतेच्या प्रचंड लाटेला तोंड देताना नागरिक मात्र वैतागून गेले आहेत. शिवाय अनेकांचे अर्थचक्र कोलमडले आहे

सध्या एप्रिल महिना चालू असून कडक ऊन व त्याची प्रचंड दाहकता अधिक जाणवत आहे सध्या पारा वाढतच गेल्याचे पाहायला मिळत आहे. वीज गायब झाल्यास तर मग विचारणेच नको आगामी काळातही तापमानात आणखी वाढ होईल, असा इशारा हवामान



खात्याने दिल्याने चिंतेत भर पडली आहे. वाढत्या उन्हामुळे अंगाची लाहीलाही होत असून सकाळी दहानंतरच रस्ते निर्मनुष्य दिसत आहेत. शेतकरी पहाटे व भल्या सकाळी आपल्या शेतातील कामे उरकून दुपारच्या वेळी झाडाखाली विसावा घेत आहेत. शहर व तालुक्यात भरणाऱ्या आठवडी बाजार व रस्त्यावर शुकशुकाट दिसून येत आहे. या वाढत्या तापमानामुळे बाजारपेठांमधील व्यवहार थंडावलेले दिसून येत आहेत. शासकीय कार्यालयातील कामकाजावर उष्णतेचा परिणाम झाला आहे.

### भाजीपाला करपू लागला

कडक उन्हामुळे भाजीपाला व फळबागा करपू लागल्याचे चित्र दिसत आहे. भूगर्भातील पाण्याची पातळी खोलवर गेल्याने पाचशे फुटांपर्यंत बोअरवेल मारूनही पाणी लागत नसल्याने शेतकरी चिंताग्रस्त दिसत आहेत. दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या अडचणीत दिवसेंदिवस भर पडत आहे. उन्हाचा पारा हा दिवसेंदिवस वाढत जाणार असल्याने नेहमी गर्दीने फुललेली शासकीय कार्यालय, इतर ठिकाणेही ओस पडत आठवडी बाजार थंड आहेत. वाढत्या उन्हाचा फटका शासकीय कामावर पडत असून शासकीय कार्यालयातही नागरिकांची वर्दळ कमी दिसत आहे.

## केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांचा ड्रीम प्रोजेक्ट अंतिम टप्प्यात



जालना । प्रतिनिधी

मराठवाडा आणि लगतच्या विदर्भातील उद्योग, व्यापार व शेतकऱ्यांना देशांतर्गत तसेच परदेशांत मालाची सहजपणे अतिशय स्वस्त दरांत वाहतूक व्यवस्था असलेल्या ड्रायपोर्ट मल्टीमोड लॉजिस्टीक पार्क चे प्रत्यक्ष कामकाजाची माहिती आणि ड्रायपोर्ट परिसराला जालना आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील उद्योजक, व्यापारी व शेतकऱ्यांनी भेट देऊन पाहणी केली. रसायन तंत्रज्ञान संस्थेच्या सभागृहात आयोजित बैठकीत भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते भास्कर पाटील दानवे यांनी मराठवाड्यातील सर्व उद्योजक, व्यापारी आणि शेतकरी ड्रायपोर्टचे प्रत्यक्ष कामकाज लवकरात लवकर सुरू होण्याची प्रतिक्षेत आहेत असे सांगून तो सुवर्ण क्षण उगवला आहे असे म्हटले हा प्रकल्प संपूर्ण मराठवाड्याचे चित्र बदलण्याची क्षमता असलेला आहे असे दानवेंनी सांगितले माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी या ड्रायपोर्टच्या उभारण्यात खूप प्रचंड मेहनत घेतली असून खर्या अर्थाने आता विकासाला गती मिळाली आहे असे ते म्हणाले.

यावेळी सुनील रायठ्ठा, पोलाद स्टील चे संचालक नितीन काबरा, महीको चे संचालक रितेश मिश्रा, राठी व अखिलेश राठी, कालिका स्टील चे संचालक गोविंद गोयल व गोपाल गोयल, लघुउद्योग भारती संघटनेचे अविनाश देशपांडे, नितीन बागडी, भारतीय जनता पक्षाचे महानगराध्यक्ष सतीश जाधव, भारतीय जनता पक्षाचे जिल्हा संघठन मंत्री सिध्दीविनायक मुळे जिल्हा उपाध्यक्ष श्री.धनराज काबलीये मंडळ अध्यक्ष श्री.महेश निकम श्री.निवृत्ती लंके उपस्थित होते. बैठकीचे सुत्रसंचलन अर्जुन गेही यांनी केले यावेळी राष्ट्रीय महामार्ग कार्पोरेशनचे राजकुमारसिंग चव्हाण, सहायक सुर्जितो मोहंतो आणि जालना ड्रायपोर्टचे टर्मिनल मॅनेजर विकास मलिक यांनी ड्रायपोर्ट संचलनासंदर्भात सविस्तर माहिती दिली उपस्थितांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली.

## मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानाचे बक्षीस वितरण



अंबाजोगाई। प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्रमांक दोन अंतर्गत शुक्रवारी (दि. २५) पंचायत समितीच्या सभागृहात बक्षीस वितरण पार पडले. यावेळी जिल्हा परिषद गट व संस्था गटातील सहा शाळांना बक्षिसाच्या रक्कमेचा चेक वितरित करण्यात आला.

राज्यातील सर्वच शाळांचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री माजी शाळा सुंदर शाळा हे अभियान शासनाने सुरू केले आहे. या अभियानांत शाळांना लाखो रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आलेले आहे. अंबाजोगाई तालुक्यातील सर्व जिल्हा परीषदेच्या व खाजगी शाळे मध्ये हे अभियान राबवीण्यात आले. शासनाने ठरवून दिलेले निकष पुर्ण करण्याऱ्या शाळांची तपासणी होऊन त्यांना प्रथम, व्दितीय व तृत्तीय बक्षीस जाहीर करण्यात आले. याचे बक्षीस वितरण शुक्रवारी पंचायत समितीच्या सभागृहात पार पडले. गटविकास अधीकार समृध्दी दिवाणे, गटशिणाधिकारी चाँद शेख, विस्तार अधीकार बी. के. नांदुकर, मधुकर सुर्वणकार, मुमताज पठाण यांच्या हस्ते बक्षीसाच्या रक्कमेचा चेक वितरीत करण्यात आला. तालुक्यातील आपेगाव येथील जयकिसान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयास संस्था गटाअंतर्गत दुसरे बक्षीस मिळाले. शाळेचे मुख्याध्यापक प्रा. एन. के. हजारे, प्रा. पी. एस. तरकसे, केंद्रप्रमुख आर. जी. पवार यांनी बक्षीसाच्या रक्कमेचा दोन लाख रुपयांचा चेक प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते स्विकारला. या कार्यक्रमास तालुक्यातील मुख्याध्यापक विस्तारधीकारी, केंद्रप्रमुख उपस्थित होते. जिल्हा परिषद गट व संस्था गटातील शाळा अश्या दोन गटात ही स्पर्धा घेण्यात आली. जिल्हा परीषद गटात प्रथम जि. प. मा. शा. राडी, व्दितीय जि. प. प्रा. शा. नांदगाव, तृत्तीय जि. प. के. प्रा. शा. भावठाणा. संस्था गटात प्रथम योगेश्वरी नुतन मुलांचे विद्यालय अंबाजोगाई, व्दितीय जयकिसान मा. व उच्च मा. विद्यालया आपेगाव, तृतीय श्रीरात माध्यमिक विद्यालय भारज. या सहा शाळांना बक्षीसाची रक्कम वितरीत करण्यात आली. प्रथम बक्षीस तीन लाख, व्दितीय दोन लाख तर तृत्तीय एक लाख रुपयांचे होत.

# स्पर्धा परीक्षा सेमिनारने उर्जा पेरली

अंबाजोगाई। प्रतिनिधी

घाटनांदूरसह परिसरातील माती यशवंतांची व गुणवंतांची खाण असल्याने शिक्षणप्रेमींचे तिर्थक्षेत्र अमृतमहोत्सवी सोमेश्वर शैक्षणिक संकुलाने घाटनांदूर व परिसरातील तरुणाईसाठी स्पर्धा परीक्षा सेमिनार आयोजन केले होते.दि.२४ एप्रिल २०२५ रोजी अभ्यासु, तज्ञ, यशवंत आणि अनुभवी मार्गदर्शक श्री सुहास बलभिम माने, संचालक, अग्निपंख स्पर्धा परीक्षा केंद्र व सोमेश्वर विद्यालयाच्या शिक्षिका श्रीमती पी.पी.पाटील यांनी उपस्थितीत प्रेरक स्पर्धा परीक्षा सेमिनार संपन्न झाले.

यावेळी श्रीमती पाटील मॅडम यांनी पोलिस, सैन्य व वनरक्षक भरतीचे गुणदान, योग्य मार्गदर्शन, टप्पे व शारिरीक चाचणीची सुक्ष्म माहिती देवुन ‘‘पाच मिनिटे डोळे बंद करुन आईवडीलांचे स्मरण करणे ही सर्वात



मोठी प्रेरणा असते,‘‘ असे सांगितले. यावेळी मार्गदर्शन करताना प्रा.सुहास माने यांनी, ‘‘टक्केवारी व स्पर्धा परीक्षेचा संबंध नसुन घेतलेल्या निर्णयावर टिकुन राहणे आणि निर्णयाचे यशात रुपांतर करणे महत्वाचे आहे. शंभर टक्के यशासाठी शंभर टक्के मेहनत महत्वाची आहे,‘‘ असे प्रतिपादन केले. यावेळी दोन्ही मान्यवरांनी उपस्थित तरुणाईला महाराष्ट्र लोकसेवा आयोग, स्टाफ सलेक्शन, सैन्यभरती, तलाठी, पोलिस, एलआयसी, रेल्वे, बँक, पोस्ट, कृषी, वनरक्षक व लिपिक यासह सर्व स्पर्धा परीक्षांची पुर्वतयारी कशी करावी ? कोणती पुस्तके वाचावीत ? मैदानाचे निकष काय आहेत ? प्रश्नपत्रिकांचे स्वरुप कसे असते ? रिक्त जागा कुठे आहेत ? फॉर्म कसे भरावे ? रिजर्वेशन आदी विषयावर सखोल मार्गदर्शन करुन आणि महत्वाची माहिती देवुन उपस्थितांत उर्जा व प्रेरणा पेरली.

सेमिनारचे सुत्रसंचलन, प्रस्ताविक व आभार आर.बी.कोलपुसे सरांनी व्यक्त केले. यावेळी उच्च माध्यमिक शिक्षकांसह दहावी ते पदवीपर्यंतचे विद्यार्थी–विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मोदी ज्वेलर्सच्या नथ महोत्सवाने अक्षय्य तृतीया होणार आणखी रंगतदार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अक्षय्य तृतीया हा स्त्रियांसाठी सोने खरेदीसाठी अतिशय महत्त्वाचा सण आहे. यानिमित्ताने अंबाजोगाई शहरात मोदी ज्वेलर्सच्या अक्षय्य तृतीया निमित्त खास महिलांसाठी अतिशय पारंपरिक अशा नथ महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मोदी ज्वेलर्सचे संचालक भूषण मोदी यांनी दिली आहे. अक्षय्य तृतीयेला खरेदी केलेले सोने हे कायम टिकते अशी आपली तथाभारतीय महिलांची धारणा आहे. स्त्रियांसाठी दागिने हा अगदी जिव्हाळ्याचा विषय तर आहेच त्याचबरोबर त्याचे गुंतवणूक मूल्यही खूप मोठे असल्याचे मानले जाते.म्हणूनच इतर सर्व प्रकारच्या दागिन्यांसमवेत मोदी ज्वेलर्सने खास नथ महोत्सव जाहीर केला आहे.


नथ म्हणजे प्रत्येक स्त्रीसाठी अभिमानाचा आणि मराठी संस्कृतीचा अनमोल ठेवा आहे. अंबाजोगाईमध्ये प्रथमच होणाऱ्या या महोत्सवात नथीचे विविध प्रकार जसे मराठा नथ, पिकॉक नथ , कारवारी नथ , स्टोन नथ , जिजाऊ नथ , बानू नथ, म्हाळसा नथ, कास्टिंग नथ,पेशवाई नथ, जोधा अकबर नथ, डायमंड नथ अशा विविध व्हरायटीज पहायला मिळणार आहेत. पारदर्शी व्यवहार तसेच अगदी आपल्या बजेटमध्ये बसणाऱ्या सोन्या चांदीच्या दागिन्यांची लेटेस्ट व्हरायटीज आणि आपुलकीची सेवा यामुळे मोदी ज्वेलर्सला ग्राहकांची पसंती मिळते आहे.यंदाही अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर सोने खरेदीसाठी पेढीला आणि नथ महोत्सवाला ग्राहकांनी मोठ्या संख्येने भेट द्यावी असे आवाहन मोदी ज्वेलर्स च्या वतीने करण्यात आले आहे.

## खोलेश्वर महाविद्यालयात दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली अर्पण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जम्मू–काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात अनेक पर्यटकांचा मृत्यू झाला. अतिशय निर्घृण आणि संताजनक अशा या घटनेचे पडसाद संपूर्ण देशभर उटलेले आहेत. या दहशतवादी हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी येथील खोलेश्वर महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी व्यासपीठावर भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या केंद्रीय कार्यकारणीचे सदस्य आप्पाराव यादव, प्राचार्य डॉ. दीपक फुलारी, वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य गौतम गायकवाड व डॉ. बिभीषण फड, व्यवसाय शिक्षण विभागाचे उपप्राचार्य डॉ.रवींद्र कुंबेफळकर , कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य आनंद पाठक यांची उपस्थिती होती.

यावेळी एन.सी.सी विभागातील मेजर सुंदर खडके यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या



मनोगतात ते म्हणाले की , अतिशय संतापजनक आणि हृदयद्रावक अशा या प्रसंगाने संपूर्ण देश उद्विग्न झाला आहे. भारत सरकार ने या घटनेचा निषेध जागतिक स्तरावर नोंदवून या हल्ल्यातील दहशतवाद्यांची व त्यांच्या सूत्रधारांची चौकशी करण्यास सुरुवात केली आहे असे बोलून त्यांनी यातील दोषींना लवकरात लवकर शासन होईल असा आशावाद व्यक्त केला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक ,शिक्षकेतर कर्मचारी आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# देशाला समस्यामुक्त करण्याची क्षमता आंबेडकरवाद्यांमध्ये आहे - ॲड. शाम तांगडे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अथक परिश्रमातून व संघर्षातून देशाला मानवी मूल्ये प्रदान करणारे संविधान दिले. तसेच धम्मक्रांतीच्या माध्यमातून संविधान मूल्यांचे रक्षण करणाचा लाखो अनुयायांचा जनाधार राष्ट्राला दिला. देशाच्या समस्या सोडविण्यासाठी कटिबद्ध असा जनाधार हा आंबेडकरवादी जनाधार आहे. देशाला योग्य दिशानिर्देशन करणारा जनाधार हा आंबेडकरवादी आहे. संविधान आणि धम्म ही या आंबेडकरवादी जनाधाराची बलस्थाने आहेत. आज देशाचे भवितव्य उथळ लोकांच्या हाती आहे. ते देशात समस्या निर्माण करत आहेत. भेदभाव निर्माण करत आहेत. यावर मात करण्याची जबाबदारी ही आंबेडकरवाद्यांची आहे. देशाला समस्यामुक्त करण्याची क्षमता ही आंबेडकरवाद्यांमध्ये आहे. असे विचार ॲड शाम तांगडे यांनी व्यक्त केले आहेत. परळी येथे आयोजित भीमजयंती महोत्सव कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. आंबेडकरवाद्यांची बलस्थाने : संविधान आणि धम्म या विषयावर त्यांनी आपले




विचार व्यक्त केले.

याप्रसंगी पुढे बोलतांना ते म्हणाले की डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वप्रथम गुलाम असलेल्या लोकांसाठी मताधिकाराची मागणी केली. आंदोलनाच्या माध्यमांतून त्यांना मान , सन्मान व प्रतिष्ठेचे धडे देऊन स्वाभिमानी चळवळव उभी केली. महाडला सामाजिक क्रांती करून त्यांनी अस्पृश्यता गाडली. गोलमेज परिषदेत देशाच्या स्वातंत्र्याची मागणी केली. या परिषदेने त्यांचे नेतृत्व जगतमान्य झाले. भेदभावाला खतपाणी घालणारा मनूचा कायदा त्यांनी नष्ट केला. विविधतेला एकासुत्रात गुंफून त्यांनी संविधान निर्माण केले. व्यक्तीला मान, सन्मान व प्रतिष्ठा देणारे नवी मूल्ये त्यांनी देशाला दिली. भारतीयता जोपासणारा नवा राष्ट्रवाद त्यांनी दिला. पण शासनाने संविधानाला आपला कृतीकार्यक्रम केले नाही. शिवाय त्यांनी संविधानाची मूल्ये ही लोकांपर्यंत नेली नाही. संविधान मूल्ये लोकाभिमूख करण्याचे काम आंबडकरवादी चळवळीने केले. बहिष्कृतांना स्थैर्य मिळवून देण्यासाठी व त्यांना राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात सक्रिय ठेवण्यासाठी त्यांनी धम्मक्रांती केली. धम्मक्रांतीच्या माध्यमातून त्यांनी लाखो लोकांचा जनाधार हा राष्ट्रसंचलनासाठी देशाला अर्पण केला. हा आंबेडकरवादी जनाधार देशातील सर्व प्रकारच्या समस्यांवर मात करण्यासाठी कार्यरत आहे. महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या माध्यमातून हा आंबेडकरवादी जनाधार आता जगाचे केंद्रक झाला आहे. असे ते म्हणाले. डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर रेल्वे स्टेशन मैदान येथे हा व्याख्यान कार्यक्रम संपन्न झाला. सुरुवातीस पाहुण्यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा विलास रोडे यांनी केले. प्रास्ताविक प्रा दासू वाघमारे यांनी केले. तर आभार प्रदर्शन भास्करनाना रोडे यांनी केले. कार्यक्रमास परळी शहरातील विविध नगरातील नागरिकांची उपस्थिती होती.

## १६ व्या शिवार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी पडलवार

माजलगाव । प्रतिनिधी

मराठवाडा साहित्य परिषद शाखा माजलगाव च्या वतीने १६ व्या शिवार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ना.मा. पडलवार तर स्वागताध्यक्षपदी भारत होके यांची निवड करण्यात आली.

मराठवाडा साहित्य परिषद शाखा माजलगाव च्या वतीने दरवर्षी शिवार साहित्य संमेलनाचे आयोजन शेतात करण्यात येते. यापूर्वी मंजरथ (धाकटे), नाखलगाव, फुले पिंपळगाव, दिंद्रुड ,सादोळा, मंजरथ, रोशनपुरी, नित्रूड , पात्रूड, भाटवडगाव, मालीपारगाव या ठिकाणी शिवार साहित्य संमेलन घेण्यात आले. यावर्षीचे सोळावे शिवार साहित्य संमेलन माजलगाव येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिराच्या निसर्गरम्य परिसरात होत आहे. संमेलनाध्यक्ष ना.मा. पडलवार यांचे मी ही बोलणार हा भाषण संग्रह, विषारी पैसा, कन्यारत्न, बाई बाटली अन्? जुगार या एकांकिका प्रकाशित आहेत.



त्यांचा माझी आवड हा बालकविता संग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहे. स्वागताध्यक्ष भारत होके हे माजी नगरसेवक असून सामाजिक कार्यात नेहमी सक्रिय असतात. यावेळी आयोजित बैठकीला मसाप शाखेचे अध्यक्ष मुकुंदराव सोळंके, उपाध्यक्ष प्रा .स्नेहल पाठक, कार्यवाह प्रा .डॉ.भाऊसाहेब राठोड, कोषाध्यक्ष किशोर गुंजकर, सहकार्यवाह बालासाहेब झोडगे. प्रा. डॉ. उमेश साडेगावकर यांची उपस्थिती होती.

cmyk

# सौर कृषीपंप योजना: महावितरणकडून शेतकऱ्यांना अत्यंत महत्त्वाची सूचना

सोलापूर: शेतकऱ्यांच्या शेतातील सोलारबाबत एक महत्वपूर्ण माहिती समोर आली आहे. सोलार बसविण्यासाठी शेतकऱ्यांकडून खड्डे खोदून घेणे, वाहतुकीसाठी पैसे मागणे तसेच त्यांना सिमेंट, वाळू आणण्यास सांगणे आदी प्रकारच्या तक्रारी काही भागातून महावितरणकडे येत आहेत. त्या सर्व तक्रारींची महावितरण दखल घेण्यात आली असुन, शेतकऱ्यांनीही कोटेशन व्यतिरिक्त रक्कम कोणाला देऊ नये, असे आवाहन महावितरणने केले आहे.

कोटेशन व्यतिरिक्त रक्कम कोणाला देऊ नये,महावितरणचे आवाहन शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी महावितरणतर्फे 'मागेल त्याला सौर कृषीपंप योजना' सुरु आहे. तर यापूर्वी केंद्रसरकारच्या 'कुसुम-बी' योजनेतून सौर पंप आस्थापीत केले आहेत. अनुसुचित जाती व जमातीमधील शेतकऱ्यांना ९५ टक्के तर इतर वर्गवारीतील शेतकऱ्यांना ९० टक्के अनुदानातून सौर पंप मिळतात. त्यासाठी तीन अश्वशक्तीला (एचपी) अनुसुचित जाती व जमातीकरिता ११४८६ रुपये, इतरांकरिता २२,९७१ रुपये, पाच अश्वशक्तीसाठी अनुक्रमे १६, ०३८ रुपये




व ३२,०७५ रुपये आणि ७.५ अश्वशक्तीला २२, ४६५ रुपये व ४४, ९२९ रुपये भरावे लागतात. भरलेल्या रकमेतून सोलारपंप आस्थापित करण्यापासून त्याचे कार्यान्वयन, देखभाल दुरुस्ती आदींचा समावेश केलेला आहे. त्यामुळे कोटेशनच्या रकमे व्यतिरिक्त कोणतेही आगाऊ शुल्क घेतले जात नाही.

इथे करा तक्रार, नियमानुसार होईल कठोर कारवाई

शेतकऱ्यांनीही अशी आगाऊ रक्कम कोणाला देऊ नये अथवा साहित्य आणून देऊ नये. त्यासाठी कोणी पैशाची मागणी करत असेल तर नजीकच्या महावितरण कार्यालयाशी संपर्क साधावा. तिथे तक्रारीची दखल न घेतल्यास सोलापूर मंडल कार्यालयातील नोडल अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता कय्युम मुलाणी यांच्या ९०२९११४६८० या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून तक्रार करावी. आलेल्या सर्व तक्रारींची महावितरणकडून चौकशी केली जाईल. तसेच सोलार कंपनीचा दोष आढळून आल्यास त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे महावितरणने कळविले आहे.

टाटा पॉवरने राज्यातील २३० पेक्षा हून अधिक सार्वजनिक संस्थांमध्ये सौरऊर्जा प्रणाली

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक पायाभूत सुविधांमध्ये सौरऊर्जेचा वापर वाढवण्याच्या उपक्रमाला पाठिंबा म्हणून , टाटा पॉवरने राज्यातील २३० पेक्षा हून अधिक सार्वजनिक संस्थांमध्ये सौरऊर्जा प्रणाली यशस्वीरित्या बसविली आहे. ज्यामुळे सुमारे १०७ मेगावॅट स्वच्छ ऊर्जा क्षमता निर्माण झाली आहे.

या सौर ऊर्जा स्थापनेमध्ये प्रमुख जिल्ह्यांमधील १०० रुग्णालये (३.६ मेगावॅट), ६४ शाळा (२ मेगावॅट) आणि ७२ सरकारी आणि संस्थात्मक इमारती (१०० मेगावॅट) समाविष्ट आहेत. या प्रकल्पांमुळे अंदाजे १.३ लाख टन कार्बन डायऑक्साइड () उत्सर्जनात घट झाली आहे, जी कि २० लाख झाडे लावल्याच्या परिणामाशी समतुल्य आहे.

# भारत दुग्धजन्य उत्पादनात एक नंबर -कृषिमंत्री चौहान



कर्नाल / वृत्तसंस्था

दुग्धजन्य पदार्थ उत्पादनात भारत पहिल्या क्रमांकावर असल्याचा दावा केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केला. कर्नाल येथील राष्ट्रीय दुग्ध संशोधन संस्थेच्या दीक्षांत समारंभात कृषिमंत्री चौहान बोलत होते. यावेळी देशातील दुग्ध क्षेत्राचा विकास करण्यासाठी एकत्र येण्याचं आवाहन चौहान यांनी केलं.

चौहान म्हणाले, ''देशातील दुग्धजन्य पदार्थांची जगभर चर्चा होत आहे. जगभरातील प्रत्येक घरात भारतीय दुग्धजन्य पदार्थ पोहचले आहेत. राष्ट्रीय दुग्ध संशोधन संस्था दुग्ध क्षेत्राच्या विकासासाठी पुढाकार घेऊन महत्त्वाची भूमिका बजावू शकते. त्यासाठी एकत्र येण्याची गरज आहे.'' असं प्रतिपादन चौहान यांनी केलं. यावेळी चौहान यांनी राष्ट्रीय दुग्ध संशोधन संस्थेला एका गाव निवडणून प्रयोग करण्याचं आवाहन केलं. तसेच लखपती दीदी योजनेतून ३ कोटी महिलांना सक्षम करण्याचा पुनरुच्चार केला. प्रत्येक गाव गरीबीमुक्त करण्यासाठी अभियान सुरू करण्यात आल्याचं चौहान म्हणाले.

ब्राझील येथील १५ ब्रिक्स परिषदेतून कृषिमंत्री चौहान सोमवारी परतले. त्यांनी ब्राझीलचा अनुभव विद्यार्थ्यांना सांगितला. ब्राझीलमध्ये शेती पाहिली. तिथं पाणी कसं देतात, पिकांची काढणी कशी करतात, याचं मी बारकाईनं निरीक्षण केल्याचं चौहान म्हणाले. विद्यार्थ्यांना संबोधित करताना चौहान यांनी पंतप्रधान मोदींचं तोंडभरून कौतुक केलं.

पंतप्रधान मोदींचं विकसित भारताचं स्वप्न आहे. एक वैभवसंपन्न, गौरवसंपन्न, समृद्ध आणि शक्तिवान देश निर्माण करण्यासाठी एकत्र येऊन काम करावं लागेल, असंही चौहान म्हणाले. दरम्यान, देशातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना दुधासाठी किफायतशीर दर मिळत नाही. दुग्ध प्रक्रिया उद्योगाचा विस्तार झालेला नाही. एकूण उत्पादनाचा तुलनेत दुग्धजन्य पदार्थ निर्मितीचं प्रमाण कमी आहे. देशातून केवळ दूध भुकटीची निर्यात मोठ्या प्रमाणावर केली जाते, असं जाणकार सांगतात.

# चारा छावणी, दूध अनुदान, लसीकरण, नुकसानभरपाईसाठी इअर टॅगिंग बंधनकारक!

पुणे : राज्यात गायी, म्हशी, शेळ्या, मेंढ्या या पशुधनाची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. मात्र, अनेकदा जंगली प्राण्यांच्या हल्ल्यात शेतकऱ्यांना आपल्या या पशुधनाला मुकावे लागते. किंवा मग संसर्गजन्य रोगराईमुळे पशुधनाचा मृत्यू होतो. अशावेळी शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक फटका सहन करावा लागतो. मात्र, आता केंद्र सरकारच्या निर्देशानुसार शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळण्यासाठी आपल्या पशुधनाचे 'इअर टॅगिंग' करणे बंधनकारक असणार आहे. विशेष म्हणजे दुष्काळजन्य परिस्थितीत चारा छावणीचा लाभ मिळण्यासाठी देखील 'इअर टॅगिंग' बंधनकारक असणार आहे. तरच शेतकऱ्यांना चारा छावणींचा लाभ मिळेल, असे राज्याच्या कृषी, पशुसंवर्धन आणि दुग्धविकास विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

इतकेच नाही यात तर शेतकऱ्यांना मिळणारे दूध अनुदान हे देखील याच 'इअर टॅगिंग'च्या माध्यमातून दिले जाते. त्यामुळे केंद्राच्या सूचनांनुसार 'इअर टॅगिंग' सध्याच्या घडीला दूध अनुदान आणि दुष्काळी परिस्थितीमध्ये जनावरांना चारा छावणी मिळणे शेतकऱ्यांना मुश्कील होऊ शकते. राज्य सरकारने याबाबत काही दिवसांपूर्वी शासन निर्णय जाहीर केला होता.

या शासन निर्णयानुसार कार्यवाही केली जाणार असल्याने उन्हाळ्यात उभारल्या जाणाऱ्या चारा छावण्यात आपली जनावरे दाखल करताना पशुपालकांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो. असेही कृषी, पशुसंवर्धन आणि दुग्धविकास विभागाने म्हटले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या सरसकट सर्वच पशुधनाचे 'इअर टॅगिंग' करून घ्यावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

'इअर टॅगिंग' का आहे महत्वाचे?

जंगली प्राण्यांच्या हल्ल्यात पशुधनाचा वन विभागाकडून बाजारमूल्यानुसार भरपाई मिळते. मात्र, त्यासाठी पशुसंवर्धन विभागाकडून जनावराचे मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी 'इअर टॅगिंग' आवश्यक आहे. 'इअर टॅगिंग' नसेल तर राज्य सरकारकाच्या चारा छावण्यांमध्ये शेतकऱ्यांना लाभ मिळणार नाही.

दूध अनुदान मिळण्यासाठी 'इअर टॅगिंग' बंधनकारक करण्यात आले आहे. सांसर्गिक रोगांना प्रतिबंध व नियंत्रणादरम्यान लसीकरणासाठी 'इअर टॅगिंग' बंधनकारक करण्यात आले आहे. 'इअर टॅगिंग' नसेल तर बाहेरच्या राज्यातून महाराष्ट्रात पशुधनाची वाहतूक करता येणार नाही. पशुंच्या खरेदी-विक्रीसाठी 'इअर टॅगिंग' बंधनकारक करण्यात आले आहे.




# कोंबड्यांमध्ये वाढतोय उष्माघात? जाणून घ्या लक्षणे, करा हे उपाय!

सध्या महाराष्ट्रात उष्णतेची लाट सुरू आहे. माणसांप्रमाणे जनावरांना सुद्धा या उष्णतेचा फटका बसत आहे. विशेषतः कोंबड्यांमध्ये उष्माघाताची लक्षणे आढळतात. पुढील काही महिने कोंबडी पालन व्यवस्थापनाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. उन्हाळ्यात मांसल कोंबड्यांची चढ्या दराने विक्री होते. परंतु उन्हाचा ताण सहन न करू शकल्याने अंडी, मांस उत्पादनात घट दिसून येते.

कोंबड्यांच्या योग्य वाढीसाठी १८ ते २१ अंश सेल्सिअस तापमानाची आवश्यकता असते परंतु ते २८ ते ३० अंश सेल्सिअस पर्यंतचे तापमान सहन करू शकतात. परंतु ३० अंश सेल्सिअसच्या वरती तापमान गेल्यास त्याचा त्यांच्या उत्पादन आणि प्रजोत्पादनावर विपरीत परिणाम होतो. बाह्य तापमान ३५ अंश सेल्सिअसच्या वर गेल्यास प्रति अंश सेल्सिअस तापमान वाढीने ५ टक्के उत्पादन घट होते. जास्त तापमानात कोंबड्यांमध्ये खालील प्रमाणे उष्माघाताची लक्षणे आढळतात.

उष्माघाताची लक्षणे : कोंबड्या तोंडावाटे श्वास घेतात, तोंडाची उघडझाप करून धापा टाकतात त्वचा रखरखीत होते, रंगामध्ये बदल दिसून येतो. पाणी जास्त पितात. भूक मंदावते. पोट जमिनीला घासतात, डोळे बंद करतात, हालचाल मंदावते, सुस्त राहतात. अंडी उत्पादनात घट होते, अंड्याचे वजन कमी होते. अंड्याच्या बाहेरील कवचाची गुणवत्ता कमी होते. शारीरिक वजनात लक्षणीय घट होते, मांसल कोंबड्यांचे



वजन कमी होते. प्रजोत्पादन यावर उष्णतेचा विपरीत परिणाम होतो. रोगप्रतिकार शक्तीही कमी होते, त्यामुळे आजारास बळी पडतात. खाद्याचे मांसात वा अंड्यात रूपांतर क्षमता कमी होते. कोंबड्या भिंतीच्या आडोशाला पडून राहतात. काही कोंबड्या पिण्याच्या पाण्याच्या भांड्याजवळ थंड जागेत मान वाकवून बसतात. शरीराचे तापमान कमी करण्यासाठी व शरीरात थंडपणा आणण्यासाठी पंख शरीरापासून दूर पसरवितात. दीड किलो पेक्षा अधिक वजनाच्या कोंबड्यांना दुपार ते संध्याकाळच्या वेळी ताप येतो. लालसर होऊन मरतात.

उपाय योजना :

शेड बांधताना घराची लांबी पूर्व-पश्चिम ठेवावी. वायुवीजन व्यवस्था सक्षम असावी. उन्हाळ्यात गादीसाठी लाकूड भुश्याऐवजी भाताचे तूस किंवा भुईमुग टरफलांचा वापर करावा. गादी म्हणून वापरात येणार्या तूसाची जाडी कमी (१ ते १.५ इंच) करावी. कोंबड्यांची संख्या किमान १० टक्क्यांनी कमी करावी. थंड, स्वच्छ, ताजे पिण्यायोग्य पाणी मुबलक प्रमाणात पुरवावे. पिण्याच्या पाण्याची भांडी संख्या दुप्पट वाढवावी. पिण्यासाठी क्लोरीनयुक्त पाण्याचा वापर करावा. यामुळे पाण्यातून होणारे आजार टाळता येतील. पिण्याच्या पाण्यामधून जीवनसत्व (क, ई), सेलेनीअम यांचा वापर करावा. त्यामुळे उष्णतेचा ताण कमी होईल. पिण्याच्या पाण्याची टाकी शेडमध्ये विशिष्ट उंचीवर बसवावी. बाहेरच्या बाजूस बसवली असेल तर त्यास बारदानाची पोती गुंडाळून त्यावर थंड पाणी टाकावे, जेणेकरून आतमधील पाणी थंड राहण्यास मदत होईल. ब्रॉयलर कोंबडीच्या खाद्यात मुख्य ऊर्जा स्रोत म्हणून वनस्पती तेलाचा ४ ते ५ टक्के या प्रमाणात वापर करावा.

अंडी देणाऱ्या कोंबडीच्या खाद्यात खाण्याचा सोडा वापरावा. अंडी देणाऱ्या कोंबडीच्या खाद्य भांड्यात टाकलेल्या खाद्य पृष्ठभाग यावरती शिंपले अथवा मार्बलचे तुकडे थोड्या प्रमाणात पसरावेत. स्प्रिंकलर्स आणि फॉगर्स यांचा वापर हा सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंतच्या दरम्यान दर १ ते २ तासांनी करावा. खाद्य देण्याचे एक वेळापत्रक ठरवून घ्यावे. त्याचे काटेकोरपणे पालन करावे. खाद्य दिल्यानंतर साधारणतः अर्धा ते दीड तासात कोंबड्यांच्या शरीर तापमानात वाढ होते. यामुळे त्यांच्यावरील उष्णतेचा ताण वाढतो, म्हणून दुपारचे खाद्य देणे टाळावे. बाजूच्या भिंतीच्या जाळीवरती बारदान पोती लावावीत. त्यावर स्प्रिंकलर्सचे पाणी पडेल याची सोय करावी. शेड नेटचा वापर करता येतो. शक्य असल्यास शेडमध्ये कुलर किंवा पंखा याचा वापर करावा. छतावर सूर्यप्रकाश परावर्तित करणाऱ्या पत्र्यांचा वापर करावा जेणेकरून शेडच्या आतील तापमान कमी राखण्यास अधिक मदत होते.




## महत्वाच्या घटना

१४७८ : इटलीतील पाझींनी फ्लोरेन्समध्ये चर्चमधील रविवारच्या सामूहिक प्रार्थने दरम्यान लॉरेन्झो दि मेदिची वर हल्ला केला. लॉरेन्झोचा भाउ ज्युलियानी मृत्युमुखी पडला.
१६०७ : इंग्लंडचे काही वसाहती केप हेन्री, व्हर्जिनिया येथे पोचले. यांनी पुढे जेम्सटाउन शहर वसवले.
१६५४ : यहुदी लोकांना ब्राझील देशातून बाहेर काढून देण्यात आलं.
१७५५ : रशियातील जुन्या प्रख्यात मॉस्को विद्यापीठाची स्थापना.
१८०२ : नेपोलियन बोनापार्टने फ्रेंच क्रांतीत देशाबाहेर पळून गेलेल्या जहागिरदारांना माफी जाहीर केली व परत फ्रांसमध्ये बोलावले.
१८४१ : साली बॉम्बे गॅझेट या इंग्रजी वृत्तपत्राची स्थापना मुंबई येथे करून त्यांचे वृत्तपत्राचे प्रकाशण सर्वप्रथम एका रेशमी कापडावर करण्यात आले.
१८६५ : अमेरिकन यादवी युद्ध दक्षिणेच्या जनरल जोसेफ जॉन्स्टनने उत्तरेच्या विल्यम टेकुमेश शर्मन समोर उत्तर कॅरोलिनातील ड्युरॅम येथे शरणागती पत्करली.
१८६५ : अब्राहम लिंकनची हत्या करून पळालेल्या जॉन विल्कस बूथला सैनिकांनी ठार केले.
१९०३ : अटलेटिको माद्रिद असोसिएशन फुटबॉल क्लबची स्थापना झाली.
१९०३ : महात्मा गांधी यांनी दक्षिण आफ्रिकेतील भारतीय लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी वकिली सुरु केली. तसचं त्यांनी त्या ठिकाणी ब्रिटीश इंडिया असोसिएशनची स्थापना केली.
१९२५ : पॉल फोन हिंडेनबर्ग वायमार प्रजासत्ताकच्या राष्ट्राध्यक्षपदी.
१९३३ : जर्मनीची गुप्त पोलिस यंत्रणा गेस्टापोची रचना.
१९३७ : जर्मनीच्या लुफ्तवाफेने स्पेनच्या गर्निका शहरावर बॉम्बफेक केली. याचे परिणाम पाहून ख्यातनाम चित्रकार पाब्लो पिकासोने गर्निका हे जगप्रसिद्ध चित्र काढले.
१९४२ : मांचुरियाच्या हॉन्केइको कोलियरी या कोळशाच्या खाणीत स्फोट. १,५४९ कामगार ठार. आत्तापर्यंतचा खाणीत झालेला हा सगळ्यात मोठा अपघात आहे.
१९५६ : भारतातील पहिल्या वृत्तपत्रकागदाच्या कारखान्याचे पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते उदघाटन.
१९६२ : नासाचे रेंजर ४ हे चांद्रयान चंद्रावर कोसळले.
१९६४ : टांगानिका व झांझिबार देश एकत्र आले.
१९७० : सुवेझ कालवा भागामध्ये पुन्हा एकदा चकमकी सुरू झाल्या. इजिप्त व इस्त्रायल यांचे हवाई हल्ले सुरू झाले. एकमेकांविरुद्धचे शत्रुत्व आणि विभागीय सत्ता संतुलन, हक्क यासाठी सशस्त्र संघर्ष सुरू.
१९७३ : अजित नाथ रे भारताचे १४ वे सरन्यायाधीश झाले.
१९८६ : युक्रेनमध्ये चर्नोबिल अणु भट्टीत अपघात. घातक किरणोत्सर्गाने युरोप, एशियातील अनेक देश प्रभावित.
१९८९ : बांगलादेशमधे चक्रीवादळामुले सुमारे १,३०० लोक ठार, १२,००० जखमी आणि ८०,००० बेघर झाले.
१९९४ : चायना एरलाइन्सचे एरबस ए-३००जातीचे विमान जपानच्या नागोया विमानतळावर कोसळले. २६४ ठार.
१९९५ : आशियाई विभागीय बुद्धिबळ स्पर्धेत भारताच्या निशा मोहोताने इंटरनॅशनल वुमन मास्टर किताब मिळवला.
२००२ : जर्मनीच्या एरफर्ट शहरात रॉबर्ट स्टाइनहाउझरने आपल्या शाळेतील १३ शिक्षक, २ विद्यार्थी व १ पोलिस अधिकार्याला ठार मारले.
२००५ : २९ वर्षांनी सिरियाची लेबेनॉनमधून माघार.
२००८ : जम्मू काश्मीर राज्यात निर्मित ३९० मेगावॅट क्षमता असलेला दुल हस्ती हायडल पॉवर प्रकल्प तत्कालीन पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी देशाला समर्पित केला.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४७९ : वल्लभाचार्य, कृष्णभक्तीचा एक वेगळा पंथ पुष्टिमार्ग स्थापन करणारे थोर पुरुष.
१८६४ : स्वामी दयानंद सरस्वती यांचे शिष्य तसचं, आर्य समाजातील प्रमुख पाच नेत्यांपैकी एक पण्डित गुरुदत्त विद्यार्थी यांचा जन्मदिन.
१८९४ : रुडॉल्फ हेस, नाझी अधिकारी.
१९०० : चार्ल्स रिश्टर, अमेरिकन भूशास्त्रज्ञ.
१९०८ : सर्वमित्र सिकरी, भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश.
१९१७ : आय.एम.पै, अमेरिकन स्थापत्यविशारद.
१९४० : भारतीय मोल्वी आणि राजकारणी मोल्वी इफ्तिखार हुसैन अन्सारी यांचा जन्म. (मृत्यू: ३० सप्टेंबर २०१४)
१९४८ : अभिनेत्री मौशमी चटर्जी यांचा जन्म.
१९५३ : भारतीय हिंदी चित्रपट अभिनेत्री मौसमी चटर्जी याचा जन्मदिन.
१९६३ : जेट ली, चीनी अभिनेता.
१९७० : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची पत्नी मेलानिया ट्रम्प यांचा जन्म.
१९८७ : प्रसिद्ध भारतीय चित्रपट निर्देशक, छायाचित्रकार व लेखक नितीन बोस यांचा जन्मदिन.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

११९२ : गो-शिराकावा, जपानी सम्राट.
१४८९ : अशिकागा योशिहिसा, जपानी शोगन.
१९२० : श्रीनिवास रामानुजन, प्रसिध्द गणिततज्ञ.
१९२४ : रमाबाई महादेव रानडे.
१९७६ : साहित्यिक चिंतामणी त्र्यंबक खानोलकर ऊर्फ आरती प्रभू यांचे निधन. (जन्म: ८ मार्च १९३०)
१९८२ : प्रतिष्ठीत भारतीय हिंदी कवी, लेखक व आलोचक मलयज यांचे निधन.
१९८७ : शंकर-जयकिशन या जोडीतील संगीतकार शंकरसिंग रघुवंशी यांचे निधन. (जन्म: ५ ऑक्टोबर १९२२)
१९९९ : लोकशाही पद्धतीने निवडण्यात आलेले नेपाळचे पहिले पंतप्रधान मनमोहन अधिकारी यांचे निधन. (जन्म: २० जून १९२०)
२०१० : राजस्थान राज्याच्या माजी राज्यपाल प्रभाराव याचं निधन.

# अत्यंत दुःखाची निवृत्ती व परमानंदाची प्राप्ती हे जिवाचे कर्तव्य आहे-सिद्धेश्वर महाराज बागलाने

बीड । प्रतिनिधी

मृत्युलोकी प्रत्येक जीवास सुखाची अपेक्षा आहे .दुःख कोणास आवडत नाही .सुखासाठी प्रयत्न करतात पण दुःखच जास्त मिळतात. संत मात्र प्रत्येक जीवाचे दुःख उच्चाटन करून परमानंद प्राप्त करून देतात. म्हणजेच अत्यंतिक दुःखाची निवृत्ती व परमानंदाची प्राप्ती करणे हे जिवाचे कर्तव्य आहे असे प्रतिपादन हरिभक्ती परायण सिद्धेश्वर महाराज बागलाने यांनी विठ्ठल मंदिर, अंबिका नगर, पांगरी रोड बीड येथे तिसरे कीर्तन पुष्पगुंफतांना केले. बीड येथील विठ्ठल मंदिर अंबिका नगर पांगरी रोड येथे विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या विसाव्या वर्धापन दिनानिमित्त व वै.उत्तमराव सारंगकर यांच्या ८व्या पुण्यस्मरणानिमित्त विसाव्या शतकातील महान संत हरिभक्त परायण सद्गुरु ज्ञानेश्वर माऊली दादा यांच्या कृपाशीर्वादाने व तपो निधी हभप नारायण महाराज श्री संत माऊली महाराज संस्थान उत्तरेश्वर पिंपरीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व शुभ हस्ते सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात तिसरे कीर्तन पुष्पगुंफतांना देव घ्या कोणी देव घ्या कोणी/ आयता आला घर पुसोनि//१//या संत तुकाराम महाराज यांच्या सहा चरणी अभंगातून हरिभक्त परायण सिद्धेश्वर महाराज बागलाने यांनी तुकाराम महाराज यांना आलेला स्वानुभव सांगितलेला आहे.



आपल्या अभंग निरूपणातून बोलताना सिद्धेश्वर महाराज बागलाने म्हणाले की , या भूतलावर देव संत व जीव येतात. देव हा जेव्हा धर्माला ग्लानी येते त्यावेळी दृष्टांचा नाश करण्यासाठी व धर्माची स्थापना करण्याकरता अवतार घेतात .संत हे जड जीवाचा उद्धारकरण्यासाठी येतात व जीव हा सर्व दुःख नाश व सुखाच्या प्राप्ती करता भूतलावर येतात. माणसांनी आपला तो एक देव करुनी घ्यावा कारण त्यांनीच मनुष्य सुखी होणार आहे. देवाला घेण्याकरिता भक्तीचे माप आहे. तो घेताना त्यास भाव, प्रेम ,विश्वास अर्पण केला पाहिजे अंतकरणात जोपर्यंत विकार आहेत तोपर्यंत देव तिथे उमटणार नाही .देव घेण्याकरता तो भक्तीच्या मापाने घेतला जावा. भक्तीच्या मापे मोजतो अनंता/ इतराने तत्वतः न मोजवे /संसारात दोष दुःख आहे व ते कोणालाच नको आहे. सर्वजण सुखाचीच अपेक्षा करतात. आपण देवास आपले प्रेम भाव अर्पण केल्यास तो त्याने बांधला जातो. भक्ती केल्यास तो आयताच चालून येतो व आपले दुःख नाहीसे करतो. संताचा अवतारच जगाच्या कल्याणाकरता आहे . देवाला जीवांचा उद्धार करण्याकरता संत होऊन ज्ञान देऊन मोक्ष प्रदान करावा लागतो. तो देव संतामुळे सर्वांना प्राप्त झाला आहे. तो सर्वांनी करून घ्यावा असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी हरिभक्त परायण नारायण महाराज गिरी (भागवताचार्य ) रामहरी रसाळ गुरुजी, विभागीय प्रवक्ता अखिल भारतीय वारकरी मंडळ, श्री अनंत घीगे साहेब जिल्हा प्रसिद्धी प्रमुख वारकरी मंडळ व पत्रकार दैनिक रिपोर्टर, सुनील लांडगे, दिलीप वखरे, विठ्ठल कथले,अजय सारंगकर गुरुजी ,रामचंद्र कागदे गुरुजी, गायक म्हणून ह भ प चिंतामण महाराज मोरे ,नवनाथ महाराज नाईकवाडे ,अंगद महाराज सातपुते , उत्तरेश्वर महाराज पूर्वे मारुती महाराज कथले ,महारुद्र महाराज,उमाशंकर महाराज शिंदे, रामकृष्ण खटाणे महाराज मृदंग वादक म्हणून: यश महाराज तर असंख्य भाविक भक्त उपस्थित होते.

## थोडक्यात

### मानवतेला काळीमा फासणारी घटना - गणेश बजगुडे

बीड । प्रतिनिधी

काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बीड तालुका काँग्रेस व शिवक्रांती युवा परिषदेच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करत हा हल्ला अतिशय भ्याड व मानवतेला काळीमा फासणारा असुन हल्लेखोरांवर तत्काळ कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी काँग्रेसचे नेते व शिवक्रांती युवा परिषदेचे संस्थापक अध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांनी केले आहे. काश्मीर येथील पहलगाम येथे पाकिस्तानी दहशतवाद्यांनी २७ निरपराध भारतीय पर्यटकांवर गोळ्या झाडून हत्या केली. ही घटना अतिशय निंदनीय व मानवतेला काळीमा फासणारी असुन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी, गृहमंत्री अमित शहा यांनी यावर कठोरात कठोर भुमिका घेवुन ठोस उपाय योजना करायला हव्यात. जातीय धार्मिक तेढ निर्माण करून भ्याड हल्ले करणाऱ्यांवर सरकारने कारवाई तर करावीच परंतु देशाच्या सुरक्षिततेसाठी उपाय योजना देखील करायला हव्यात. या दहशतवादी हल्ल्यात मरण पावलेल्या सर्व भारतीयांना बीड तालुका काँग्रेस कमिटी व शिवक्रांती युवा परिषदेच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करत त्यांच्या कुटुंबीयांना या दुःखातून सावरण्याचे बळ परमेश्वर देवो असेही गणेश बजगुडे पाटील यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.



### दिव्यांगाच्या कागदपत्राची घरीच होणार पडताळणी

बीड । प्रतिनिधी

दिव्यांग निराधार व विविध योजनेतील लाभार्थ्यांना अपंगत्वामुळे हालचाल करता येत नसेल किंवा तहसील कार्यालयात येता येत नसेल तर अशा लाभार्थ्यांच्या कागदपत्राची (डीबीटी) आता घरीच पडताळणी होणार असून या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार सुहास हजारे यांनी केले आहे. संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ योजना, दिव्यांग लाभार्थी अतिवृद्ध व्यक्ती, असतील ज्यांना हालचाल करणे अशक्य आहे व जे तहसील कार्यालय किंवा डीबीटी कॅम्प साठी येऊ शकत नाहीत. त्यांचे आधार कार्ड, राशन कार्ड , बँक पासबुक आणि मोबाईल नंबर हा ८१४९४६८८८४ या मो. नंबर वर व्हाट्सअप ला कळवा अथवा सज्जाचे ग्राम महसूल अधिकारी तथा तलाठी व मंडळ अधिकारी यांचे मार्फत तहसीलदार कळवावे, त्यांची (डीबीटी) कागदपत्राची पडताळणी घरबसल्या करून घेतली जाईल. त्यामुळे मित्र, नातलग, परिचित, शेजारी व तालुक्यातील सर्व नागरिकांना हा मेसेज कळवावा असे आवाहन तहसीलदार सुहास हजारे यांनी केले आहे.



### न्ययायालयीन शिपाई तडकाफडकी निलंबित

बीड। प्रतिनिधी

बीड न्यायालयातील शिपाई शंकर अंबादास किरवले याने दि. २१ एप्रिल २०२५ रोजी बीड येथील बसस्थानकात महिलांकडे पाहून अश्लिल कृत्य केल्याबाबतचे वृत्त विविध वर्तमानपत्रामध्ये प्रकाशित झाले होते. शंकर अंबादास किरवले, शिपाई यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन शिवाजी नगर बीड येथे गु.र.न २३२/२०२५ कलम ७९,७५ (१) (४) भा.न्या संहिता २०२३ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून सदर गुन्हयातील प्रथम खबरी अहवाल व इतर कागदपत्रे जिल्हा न्यायालयास प्राप्त झाली असून शंकर अंबादास किरवले याचे कृत्य हे अशोभनिय असल्यामुळे शंकर अंबादास किरवले, शिपाई याला तात्काळ निलंबित करण्यात आले असून त्याच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही सुरु करण्यात येत आहे, असे अधिकृत सुत्राकडून समजले.

### पात्र कुटुंबाची सर्वेक्षण करुन ई-केवायसी पूर्ण करण्याच्या सूचना

बीड । प्रतिनिधी

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत पात्र कुटुंबाची आवास प्लस २०२४ सर्वेक्षण उपमहा निदेशक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी दिनांक ४ एप्रिल २०२५ रोजीच्या व्हिडिओ कॉन्फरन्स मध्ये आवास प्लस २०२४ सर्वेक्षण करताना पुढील बाबींच्या अंमलबजावणीसाठी सूचना दिल्या आहेत. राज्यातील सर्व १०० टक्के ग्रामपंचायत यांना सर्वेक्षकाचे मॅपिंग करून त्याची ई केवायसी १०० टक्के पूर्ण करणे, स्व: सर्वेक्षणाबाबत ग्रामपंचायत स्तरावर येथोचित जनजागृती करणे, आवास प्लस २०२४ सर्वेक्षण पूर्ण करतांना तालुकास्तरावरून किमान १० टक्के तपासणी () करण्यासाठी तपासणी म्हणून तालुक्यामध्ये कार्यरत विस्तार अधिकारी प्रर्यवेशक/ प्रर्यवेशिका, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक कनिष्ठ अभियंता, शाखा अभियंता इत्यादी प्रकारच्या शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांची निवड करणे. निवडलेला तपासणीस सर्वेक्षक नसावा याची दक्षता घेणे.

निवडलेल्या तपासणी यांना किमान १० टक्के सर्वेक्षित कुटूंबे तपासण्यासाठी तालुक्यातील ग्रामपंचायत वितरण करुन त्या ग्रामपंचायतींना त्याचे मॅपिंग करुन घेणे त्यांची ई - केवायसी पूर्ण करणे. सर्वेक्षण केलेल्या कुंटुंबाची माहिती केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाच्या परवानगीशिवाय कोठेही प्रकाशित न करणे. वरील प्रमाणे दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करून सर्वेक्षणाची कार्यवाही विहीत वेळेत पूर्ण करावी अशा सूचना संचालक ग्रामीण गृहनिर्माण महाराष्ट्र राज्य यांनी दिल्या आहेत.

## महात्मा बसवेश्वर जयंती सर्व कार्यालयात साजरी करावी-आत्मलिंग शेटे

परळी। प्रतिनिधी

जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर जयंतीही प्रतिवर्षीप्रमाणे अक्षयतृतीयेला लिंगायत विरशैव समाजाच्या वतीने सर्वत्र फार मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. यावर्षी बुधवार, दि. ३० एप्रिल २०२५ रोजी आहे. कर्नाटक व त्या परिसरातील इतर शहरामध्येही फार धुमधडाक्यात ही जयंती साजरी केली जाते. कर्नाटक सरकारचे भवितव्य हे लिंगायत समाजावर आधारीत आहे.

शासन जी.आर.:- महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय क्रमांक २२००/८१९ प्र.क्र.८९/२०००/ २९ मंत्रालय मुंबई १२/४/२००१ नुसार महाराष्ट्रातील सर्व शासकीय कार्यालय निमशासकीय कार्यालय, विविध संस्था इत्यादी ठिकाणी विरशैव सामाजाचे आराध्य दैवत साम्यवादाचे जनक क्रांतीसूर्य, जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर जयंती साजरी करावी असे आदेश आहेत. परंतु अनेक शासकीय कार्यालयात त्याची अंमलबजावणी होत नाही असे दिसून आलेले आहे. तरी या वर्षी शासन आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी असे सन्माननीय जिल्हाधिकारी यांनी बीड आदेश जिल्ह्यामधील सर्व शासकीय कार्यालयांना निदेर्शीत करावेत अशी मागणी लिंगायत संघर्ष समितीचे महाराष्ट्राचे मुख्य समन्वयक काकासाहेब कोयटे, प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्रअप्पा मुंडे, बीड जिल्हाध्यक्ष आत्मलिंग शेटे यांनी केलेली आहे. दरम्यान, दि. ३० एप्रिल २०२५ अक्षयतृतीयेच्या दिवशी मोठ्या मानसन्मानाने क्रांतीसूर्य जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर यांची जयंती सर्व विरशैव लिंगायत समाज बांधवांनी, भगीनी माताने मोठ्या उत्साहात व आपआपल्या घरी व सार्वजनिक ठिकाणी समाज मंदिरात शांततेत साजरी करावी असे आवाहन लिंगायत संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष आत्मलिंग शेटे यांनी केले आहे.

## परतूरचे गटशिक्षणाधिकारी लोंढे यांनी पदभार स्विकारला



परतुर । प्रतिनिधी

परतुर येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील गटशिक्षणाधिकारी व समन्वयक यांच्यावर निलंबनाची कारवाई झाल्यानंतर श्रीमती प्रेरणा लोंढे यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी आज रोजी गटशिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार सांभाळला यापूर्वीही त्या परतूर तालुक्यात विस्तार अधिकारी म्हणून काम पाहिले आहे. त्यांच्यासमोर बरेच प्रश्न उपस्थित आहेत ,जसे की जो शिक्षकांच्या आयकर प्रकरणाचा घोटाळा केला होता, मागील गटशिक्षणाधिकारी घोटाळेबाज गटशिक्षणाधिकारी म्हणून त्यांची अशी ओळख झालेली आहे.

तसेच परतुर तालुक्यातील कोणत्याही शाळेत मुलींसाठी मुलांसाठी सुलभ शौचालय फक्त अस्तित्वात आहेत परंतु ते वापरत नाहीत त्यांची दैनिय अवस्था आहे,तसेच तालुक्यातील शिक्षक हे नियमित शाळेवर येत नाहीत, मुख्याध्यापक शिक्षकांची मिली भगत दुसऱ्या दिवशी येऊन सही करतात. या सगळ्या प्रश्नांची सहनिशा नवीन गटशिक्षणाधिकारी मॅडम करतील का ? याकडे सर्वांचे लक्ष आहे. परतुर शहरामध्ये काही शाळेला सीबीएससी ची मान्यता नाही परंतु त्या शाळा स्टेट बोर्डची मान्यता असताना देखील सीबीएससी चे महागड्या प्रकाशनाची पुस्तके ठेवतात, त्यामुळे पालकांची लूटमार केले जाते .प्रत्येक वर्षी शाळेचा गणवेश बदलण्याची काहीच गरज नसताना कमिशन साठी हे संस्थाचालक ड्रेस बदलतात ,खाजगी प्रकाशनाची पुस्तके ठेवतात त्यामुळे त्यांना भरपूर प्रमाणात कमिशन मिळते. याकडे नवीन गटशिक्षणाधिकारी लक्ष देतील का ? पहिल्याच दिवशी पदभार स्वीकारून परतुर तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुखांची सकाळी ११ वाजता चालू असलेल्या शैक्षणिक विषयांवर आढावा बैठक घेऊन, दुपारी ३ वाजता कार्यालयीन कर्मचाऱ्यांची विभागानुसार कामकाजाची सद्यस्थिती जाणून घेऊन आवश्यक त्या सर्व सूचना आणि करावयाचे बदल याबाबत सविस्तर आढावा बैठक घेऊन अत्यंत उत्साहपूर्ण ,शिस्तबद्ध नियोजन पूर्ण कामकाजास सुरुवात करून परतूर तालुक्यातील शिक्षण विभागाचे कामास नवीन आयाम देण्यास सुरवात केली. त्यामुळे परतूर तालुक्यात पुढील काही दिवसात शिक्षण विभाग अत्यंत पारदर्शक पद्धतीने नावारूपास येणार याबाबत काही शंका नाही. स्वागतप्रसंगी गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील कल्याण बागल, शेख सत्तार , डॉ रोडगे, शिंदे, राठोड, शेख, कवटे , पवार, खाकरे, वांगीकर इत्यादी कर्मचारी उपस्थित होते.

## उन्हाळी खेळाचे क्रीडा कार्यालयातर्फे उद्घाटन

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा यांचा जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र, खेलो इंडिया प्रशिक्षण केंद्र, विविध एकविध जिल्हा क्रीडा संघटना, बीड जिल्हा यांचे संयुक्त विद्यामाने आयोजित विविध खेळांचे मोफत उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबराचे आयोजन दिनांक २१ ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत करण्यात आले असून या शिबिराचे उद्घाटन दिनांक २२ एप्रिल २०२५ रोजी क्रीडा संघटक तथा शिवछत्रपती पुरस्कारार्थी जे. पी. शेळके यांच्या हस्ते संपन्न झाले.

याप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी, डॉ. अविनाश बारगजे, आजहर शेख, विनायक ओझे, चित्रा आगळे, उत्तरेश्वर सपाटे, उत्तम काळवणे, राधा तांबे, निसार तांबोळी,विजय जाहेर, क्षितिजा गव्हाणे, रमेश शिंदे, वैभव गिरी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची प्रस्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले. यामध्ये मोफत उन्हाळी प्रशिक्षण शिबिरात क्रिकेट, खो-खो, कबड्डी, बेसबॉल, मैदानी, सॉफ्टबॉल, हॉकी, हॉलीबॉल,तायक्कॉदो, योगासन, नेटबोल, स्केटिंग, जिम्नास्टिक, कराटे, टेबल टेनिस या खेळाचे विस्तृतपणे माहिती दिली. शिवछत्रपती पुरस्कारार्थी जे. पी. शेळके यांनी उपस्थित खेळाडूंना मार्गदर्शन करताना खेळाडूंना उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचे फायदे सांगून त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षकाकडून विविध खेळाचे शास्त्रशुद्ध पद्धती प्रशिक्षण घेऊन जिल्ह्यातील शाळांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर जिल्हयाचे नाव उंचवावे व उन्हाळी प्रशिक्षण शिबिरात जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग घ्यावा असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत कवठेकर यांनी केले.

## बाबासाहेबांनी उपेक्षितांच्या प्रगतीसाठी लढा उभा केला-पप्पू कागदे

बीड/प्रतिनिधी

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी जाती व्यवस्था नष्ट करण्यासाठी व उपेक्षितांना त्यांच्या हक्काची व अधिकाराची जाणीव करून देण्यासाठी जाती व्यवस्था बदलण्याचे काम करीत भारतीय संविधानाची निर्मिती करून भारतीय लोकशाही मजबूत केली. त्याचबरोबर, आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व राजकीय प्रवाहात आणण्यासाठी व साक्षर समाज घडविण्यासाठी शिक्षणाची दारे खुली केली. आपल्या हक्क व अधिकारांसाठी लढण्यास प्रवृत्त केले. समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्यायावर आधारीत असलेली समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी आयुष्यभर संघर्ष करीत समाज बांधवांच्या प्रगतीसाठी देशभर लढा उभा केला. असे प्रतिपादन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त तलवाडा, घाटसावळी, पारगांव (सि), नाळवंडी, ताडसोन्ना या गांवी केले.



पुढे बोलतांना पप्पू कागदे म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी हजारो वर्षांची गुलामगीरी नष्ट करून अठरा पगड जातीच्या समाज बांधवांना ताठ मानेने उभे करण्यासाठी भारतीय संविधानात अनेक कलमांची नोंद करून त्याचे हक्क व अधिकार मिळवून दिले. थोर महापुरुषांचे विचार आत्मसात करून आगामी काळात युवकांनी व्यसनमुक्त समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी महापुरुषांचे विचार घरा-घरात व गावा-गावात पोहचविण्याचे काम करावे. यावेळी माजी मंत्री बदामराव पंडीत, किशोर कांडेकर, किसन तांगडे, शाहु डोळस, सुभाष तांगडे, संजय गव्हाणे, भैय्या भालेराव, आप्पा भालेराव, सुनिल कांडेकर, भाऊसाहेब भालेराव, विजय डोंगरे, अशोक आठवले, विनोद आठवले, आंबादास आठवले, युवराज डोंगरे, गिताराम डोंगरे,माऊली डोंगरे,नामदेव वाघमारे विनोद तांगडे, प्रदिप तांगडे, धम्मा तांगडे, बाळासाहेब भालेराव. राजेंद्र भालेराव अभिमान भालेराव, श्रीमंत जाधव, मसू जाधव कचरू डावकर, अमोल जाधव, अमोल डावकर,बबन डावकर यांच्यासह शेकडो अनुयायी उपस्थित होते.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा ग्रामस्थांनी केला सत्कार

मंठा। प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाटोदा येथील ८ विद्यार्थ्यांनी आयएएस श्रेया इंटेलिजंट स्पर्धा परीक्षेत राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत येत घवघवीत यश संपादन केले असून गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा २५ रोजी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डी.एस.मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली सदस्य जीवनराव वायाळ, गुणाजी नजान, मारोती जोशी, मनिषा जोशी, बाळासाहेब परभने, योगेश बोराडे, गजानन चव्हाळ, दत्तात्रय गोरे, सुदाम डोळझाके, एकनाथ घोंगडे, नामदेव बोराडे आदी पालकांनी गुणवंत विद्यार्थी व शाळेतील सर्व शिक्षकांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार केला. याप्रसंगी बाळासाहेब परभने, पीएमश्री प्रशालेचे



मुख्याध्यापक प्रकाश टोम्पे यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप डी.एस.मिसाळ यांनी केला. सूत्रसंचालन मारोती जोशी, प्रास्ताविक गंगाधर वानोळे यांनी तर आभार पी.के.यामुलवाड यांनी मानले. यावेळी नवागतांचे स्वागत करीत शाळापूर्व तयारी मेळावाही घेण्यात आला.

## ओबीसी जागरुक झाला तरच ओबीसींचा विकास शक्य-शब्बीर अहेमद अन्सारी

### ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनतर्फे हिंदू-मुस्लिम एकतेचा संदेश

बीड । प्रतिनिधी

सोमवार रोजी जिल्हाध्यक्ष हाजी शेख जाकेर यांच्या निवासस्थानी ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशन तर्फे हिंदू-मुस्लिम एकतेचा संदेश देत ईद मिलाप कार्यक्रम घेण्यात आला, या ईद मिलाप कार्यक्रमात मुख्य उपस्थिती ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष शब्बीर अहमद अन्सारी साहेब यांची होती या कार्यक्रमात बीड शहरचे राजकीय, सामाजिक व इतर सर्व क्षेत्राचे लोकप्रतिनिधी आवर्जून उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक माजी सभापती खुर्शिद आलम यांनी केले.



या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे संस्थापक अध्यक्ष शब्बीर अहेमद अन्सारी तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर हे होते. प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र वक्फ बोर्डचे अध्यक्ष मा समीर काजी साहेब, माजी आमदार सय्यद सलीम साहेब, शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, एमआयएम जिल्हाध्यक्ष शफिक भाऊ, ज्येष्ठ नेते मोईन मास्टर, फारूक पटेल साहेब, डॉ.आमेर इनामदार, डॉ. किरण सव्वासे, डॉ. रमेश कैवाडे, उद्योजक बाळू लाटे, बागवान बिरादरी जिल्हाध्यक्ष हाजी हाशम बागवान, हाजी हरून बागवान, हाजी शफिक बागवान, माजी नगरसेवक अशफाक इनामदार, माजी नगरसेवक जलील खान पठाण, माजी नगरसेवक जैतुल्ला खान, शासकीय कंत्राटदार अब्दुल मजीद उर्फ मज्जू शेठ, माजी नगरसेवक आमेर अण्णा, समाजसेवक शोएब इनामदार, शेख तय्यब सर, मोमीन जुबेर,मोमीन मोहसीन,काजी अक्रम, इरफान खान पठाण, मोमीन जुनेद, बारस्कर अब्दुल खय्युम आदी उपस्थित होते.सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हाजी नसीम इनामदार, सलामसेठ, मोमीन शाफे, हकीम मनियार, सय्यद फेरोज अली, मोमीन खालेद, इरफान कुरेशी, एकबाल कुरेशी साहब, नबील उज जमा, शफीक तंबोली, मोमीन जमीर, शेख वजीर अतार, शेख ताहेर, शेख मोहसीन, मोहम्मद सऊद, बागवान जमील, सय्यद शफीक, अब्दुल रहीम शाह यांनी परिश्रम घेतले. शेवटी आभार कार्यक्रमाचे संयोजक हाजी शेख जाकेर यांनी मानले.

राज्य लोकतंत्र
शनिवार, दि.२६ एप्रिल २०२५ | ६

# महाराष्ट्र दिनापासून जिल्ह्यात 'कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू !' या अभियानास प्रारंभ

## अभियान कालावधीत ओल्या कचऱ्यापासून बनविणार खत

बीड । प्रतिनिधी

घनकचरा व सांडपाणी या उपक्रमात निर्माण झालेल्या सुविधांचा वापर होण्याकरिता गावातील ग्रामस्थांमध्ये स्वच्छते विषयक वर्तणुकीत बदल घडवून आणने, सेंद्रिय कचऱ्याचे व्यवस्थापन करून वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेचे महत्व पटवून देणे, घनकचरा व्यवस्थापनात्त सुधारणा व पर्यावरणपूरक उपाययोजना करण्यासाठी, कचरा कमी करणे, पुनर्वापर करण्याच्या उदेश्याने दि. ०१ मे ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत ''कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू!'' अभियान राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील प्रत्येक गावात या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करावी असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी केले आहे.

### अभियानाची प्रचार व प्रसिध्दी, समुदाय सहभाग व श्रमदान

जास्तीत जास्त गावामंध्ये ही मोहीम राबविण्यासाठी १ मे पासून सुरू होणाऱ्या याअभियानाची प्रचार प्रसिध्दी स्थानिक वर्तमानपत्र व समाज माध्यमां (सोशल मिडीया) मध्ये करण्यात येईल. तसेच यशोगाथा प्रकाशित करून इतर गावांना प्रेरित करण्यात येणारआहे. अभियानाकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी, संस्था, बचतगट महिला व शेतकरी गटांचा सहभाग घेऊन गावपातळीवर श्रमदान उपक्रम राबवून जनसहभाग घेतला जाणार आहे.

गावात निर्माण करण्यात आलेल्या नाडेपच्या माध्यमातून सेंद्रिय कचऱ्याचे व्यवस्थापन करून खत निर्मिती करण्याकरीता राज्याच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे वतीने ''कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू !'' अभियान राबविण्याचे निर्देश दिले आहे. दि. ०१ मे ते दि. ३० सप्टेंबर २०२५ (मे ३१, जुन ३०, जुलै ३१ ऑगस्ट ३१, सप्टेंबर १५ असे एकूण १३८ दिवस) पर्यंत ही मोहीम राबविण्यात येत आहे. घरगुती व सार्वजनिकस्तरावर वर्गीकरण केलेल्या ओल्या कचऱ्याचे दि. २७ ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीमध्ये संकलन करण्यात येईल.




दि. २९ ते ३० एप्रिल दरम्यान या मोहिमेची विविध माध्यमांचा वापर करीत प्रचार प्रसिध्दी होईल.

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून दि. ०१ मे २०२५ ला ''कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू!'' या मोहिमेचा शुभारंभ होईल. यावेळी स्थानिकस्तरावर लोकप्रतिनिधी, अधिकारी , कर्मचारी यांची उपस्थिती राहिल. दि. ०१ मे ते दि. १० मे या कालावधीत गावातून संकलीत केलेला ओला कचरा नाडेप मध्ये कचरा भरण्यात येईल. त्यापासून खत निर्मितीनंतर १ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत नाडेप तयार झालेला खत उपसण्याची प्रक्रिया होईल. सदर अभियाना राबविणेबाबत सर्व गट विकास अधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या आहे.

### अभियानाची पडताळणी

१३८ दिवसाच्या ''कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू !'' या मोहिमेची पडताळणी जिल्हास्तर , तालुकास्तरील अधिकारी कर्मचारी करणार आहेत, हे सर्व अधिकारी कर्मचारी ओल्या कऱ्यापासून भरलेल्या नाडेप खड्डयाची पडताळणी करतील.

### अभियानाची सूचना व पुर्व तयारी :

राज्यस्तरावरून मिळालेल्या निर्देशानुसार, गटविकास अधिकारी, पं.स. स्तरावर ग्राम पंचायत अधिकारी यांची कार्यशाळा, बैठक आयोजित करतील. त्यानंतर ग्राम पंचायत अधिकारी हे ग्रामस्थांना माहिती देतील. तसेच गावात दवंडी दिली जाणार आहे. ग्रामपंचायत कार्यालय, शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रे, सोसायटी कार्यालय, तलाठी साज्ञा कार्यालयाच्या सूचना फलकावर दि. २५ ते २६ एप्रिल या कालावधीत अभियानाची माहिती प्रसारित करण्यात येईल.

या मोहिमेच्या माध्यमातून ग्रामस्तरावर नाडेपद्वारे खत निर्मिती होईल. घनकचरा व्यवस्थापनात सुधारणा व पर्यावरणपूरक उपाययोजना करण्यासाठी, कचरा कमी करणे, पुनर्वापर करणे, ज्यामुळे पर्यावरणावर होणारा नकारात्मक परिणाम कमी करता येईल. ग्रामपंचायत, बचत गट आणि युवकांचा सक्रिय सहभाग वाढविला जाणार आहे. त्यामुळे भंडारा जिल्ह्यामध्ये ही मोहीम प्रभावीपणे राबवावी असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

# आष्टीतील संत भगवान बाबा वस्तीगृह प्रकरणी अनियमिता

## संबंधित दोषींवर चौकशी करून कठोर कारवाई करावी -कैलास दरेकर

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

ऊस तोडणीच्या ऐन हंगामात विविध गावे व तांड्यावरून दरवर्षी मोठ्या प्रमाणात मजुरांचे स्थलांतर होते या स्थलांतरामुळे त्यांच्या कुटुंबियांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते ऊसतोड कामगारांच्या मुला मुलींच्या शिक्षणाची सोय होण्याच्या दृष्टीने आष्टी तालुक्यात मुली व मुलांसाठी दोन वस्तीगृहाना मंजुरी प्राप्त झाली असून आष्टी शहरात वस्तीगृहासाठी जागा उपलब्ध नसल्याने सध्या ही दोन्ही वस्तीगृह भाड्याच्या जागेत सुरू करण्यात आलेली आहेत.परंतु या भाडे तत्त्वावर जागा घेताना यामध्ये मोठी अनियमितता झालेली असून संबंधित अधिकाऱ्यांनी जागा भाडे तत्त्वावर घेण्यासाठी कोणत्याही निकषाचे पालन केले नसल्याचा आरोप करत सदरील प्रकरणाची चौकशी करून संबंधित दोषीवर कठोर कारवाई करण्याची मागणी मनसे शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी केली आहे. या प्रकरणी दिलेल्या निवेदनात संबंधित अधिकाऱ्यांनी जागा भाडेतत्त्वावर घेण्यासाठी कोणत्याही जास्तीत जास्त खपाच्या वर्तमानपत्रात जाहीर प्रगटन देण्यात आलेले नसल्याचे सांगत अर्जदार वेगळाच व जागा वेगळ्या तीन व्यक्तींच्या नावावर असताना नियमबाह्यपणे भाडे करार करण्यात आला असल्याचा आरोप दरेकर यांनी केला आहे तसेच संबंधित अर्जदारांच्या नावे ९८८० चौरस मीटर जागा उपलब्ध असताना ग्रहपाल, मागासवर्गीय मुलींचे शासकीय वस्तीग्रह त्याच ठिकाणी कसे देण्यात आले,तसेच या ठिकाणी बँक, दवाखाना, मेडिकल, व्यापारी गाळे,असताना व अर्जदार स्वतःही त्याच ठिकाणी राहत असताना जागेची स्थळ पाणी न करता भाडे करार कसे करण्यात आले याची चौकशी होणे गरजेचे असल्याचे निवेदनात म्हटले आहे. संबंधित वस्तीगृहासाठी जागेची अधिकाऱ्यांनी कोणतीही स्थळ पाहणी न करता आर्थिक देवाणघेवाणीतून या वस्तीगृहांच्या जागेसाठी भाडे करार करण्यात आल्याचा संशय असून यामुळे दोन्ही वस्तीग्रहांसाठी भाडेकरारावर घेण्यात आलेल्या जागांची त्रयस्थ समितीमार्फत चौकशी करण्याची मागणी देखील कैलास दरेकर यांनी केली आहे.तसेच या ठिकाणी अग्निशमन सुविधेसाठी जागा नसल्याचे निदर्शनास येत आहे टॉयलेट स्नानगृह तसेच ग्रंथालयासाठी जागा आधी सुविधांचा अभाव दिसून येत असून या सर्व प्रकाराची त्रयस्थ समितीमार्फत चौकशी करण्याची मागणी देखील कैलास दरेकर यांनी प्रादेशिक उपायुक समाज कल्याण विभाग छत्रपती संभाजी नगर,व्यवस्थापक संचालक मुंबई, समाज कल्याण विभाग सहाय्यक आयुक्त बीड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# प्रियंका इंगळेला रोटरीचा चंपावती रत्न पुरस्कार

## मान्यवरांच्या हस्ते वितरण सोहळा; उपस्थित राहण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

विश्वविजेत्या खो -खो संघाची कर्णधार बीडची कन्या कु.प्रियंका हनुमंत इंगळे हीला रोटरी क्लब ऑफ बीडचा चंपावती रत्न पुरस्कार जाहीर झाला होता. याचा वितरण सोहळा दि.२६ रोजी सायंकाळी ७ वाजता आयोजीत करण्यात आला आहे. रोटरीचे प्रांतपाल रो.डॉ.सुरेश साबु, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा क्रिडा धिकारी अरविंद विद्यागर यांच्या प्रमुख उपस्थितीत व माजी आमदार सुनील धांडे यांच्या अध्यक्षतेखाली हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

बीडची कन्या कु.प्रियंका हनुमंत इंगळे हीने बीडचे नाव देशभरात उंचावेल अशी कामगिरी केली. तिच्या नेतृत्वाखालील खो - खो संघाने विश्वविजेता बनण्याची कामगिरी केली. याबद्दल रोटरी क्लब ऑफ बीडच्या वतीने तिचा चंपावती रत्न पुरस्कार २०२५ देवून गौरव केला जाणार आहे. दि.२६ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता कल्याण पिंगळे (दाजी) पब्लिक स्कुलच्या सभागृहात हा कार्यक्रम होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार सुनील धांडे हे राहणार आहेत. तर रोटरी डिस्ट्रीक्ट ३१३२ चे प्रांतपाल रो.डॉ.सुरेश साबु, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा क्रिडा अधिकारी अरविंद विद्यागर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्यास बीडकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन रोटरी क्लब ऑफ बीडचे अध्यक्ष रो.डॉ.मेघराज पिंगळे, रो. संदीप खोड, प्रोजेक्ट चेअरमन रो.सुरेश लड्डा, को. प्रोजेक्ट चेअरमन रो.सुहास बेद्रे यांनी केले आहे.

## डॉ.अनिस खान पठाण यांना मातृशोक

आष्टी । प्रतिनिधी



आष्टी तालुक्यातील तवलवाडी तेथील डॉ. अनिस खान पठाण यांच्या मातोश्री मुमताज हयात खान पठाण यांचे दिनांक २४ एप्रिल रोजी रात्री उशिरा निधन झाले.त्यांच्यावर शुक्रवार रोजी सकाळी नऊ वाजता काली मज्जिद कब्रस्तान मध्ये दफन विधी करण्यात आला.त्या ८५ वर्षाच्या होत्या.मनमिळाऊ स्वभाव,प्रेमळ वाणी,धार्मिक वृत्ती,सहकार्य भावना यासाठी पंचक्रोशीत त्यांनी आपली एक ओळख निर्माण केली होती.त्यांना नाशेर पठाण,इम्रान पठाण डॉ.अनिस पठाण ही तीन मुले असून,सात मुली आणि पती,नातू ,नाती असा मोठा परिवार आहे. त्यांचा एक नातू दिल्ली येथे सायंटिस्ट आहे.

# ज्या शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी नाही,त्यांना शेती योजनेचा लाभ होणार बंद-तहसिलदार वैशाली पाटील

आष्टी । प्रतिनिधी

**राज्यात ॲग्री स्टॅक योजने अंतर्गत शेतकरी माहिती संच तयार करुन शेतकऱ्यांना त्याचे ओळख क्रमांक देण्याबाबतचे कामकाज मोहिम स्वरुपात राबविण्यात येत आहे.महाराष्ट्र शासन कृषी व पशुसंवर्धन विभाग,शासन निर्णय दि.११ एप्रिल, २०२५ अन्वये यापुढे कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या लाभाकरिता शेतकरी ओळखपत्र क्रमांक ( ) दि. १५/०४/२०२५ पासून अनिवार्य करण्यात आलेला असून,ज्या शेतकऱ्यांनी अद्याप शेतकरी ओळखपत्र क्रमांक ( ) साठी नोंदणी केलेली नाही.त्या शेतकऱ्यांना तातडीने सदर पोर्टलवर नोंदणी करण्यासाठी प्रवृत्त करावे यासाठी शेतकऱ्यांनी ग्राम कृषी विकास समिती व आपले जवळचे आपले सरकार सेवा केंद्राची मदत घेवून नोंदणी करुन घ्यावी,नसता ज्या शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी नाही,त्यांना शेती योजनेचा लाभ होणार बंद अशी माहिती तहसिलदार वैशाली पाटील यांनी दिली आहे.**

आष्टी तहसिल कार्यालयाच्या वतीने देण्यात आलेल्या प्रसिध्दी पत्रकात तहसिलदार वैशाली पाटील म्हणाल्या,नुकतीच मा. जिल्हाधिकारी, बीड यांनी ऑनलाईन व्ही.सी. व्दारे ॲग्री स्टॅक विषयी आढावा बैठक घेतली असता आष्टी तालुक्यामधील एकूण ६९ हजार ८२७ शेतकऱ्यांपैकी ॲग्री स्टॅक अंतर्गत फार्मर आय डी (शेतकरी ओळखपत्र) नोंदणी झगलेल्या शेतकऱ्यांची संख्या ४७हजार ६५२ इतकी असून अद्यापही २२ हजार १७५ शेतकऱ्यांनी फार्मर आय डी (शेतकरी ओळखपत्र) नोंदणी केली नसल्याचे दिसून आले असून,तालुक्यातील उर्वरित २२ हजार १७५ शेतकरी यांनी दि. ०१/०५/२०२५ पर्यंत जवळच्या आपले सरकार सेवा केंद्र सेतु केंद्रावर जावून फार्मर आय डी (शेतकरी ओळखपत्र) नोंदणी करुन घ्यावी.फार्मर आय डी (शेतकरी ओळखपत्र) म्हणजे शेतकरी व त्यांच्या शेतजमिनीची ओळख पटविणे, शेतक-याने पेरलेल्या पिकाचे नाव आणि क्षेत्र निश्‍चिती करुन माहितीच्या माध्यमातून शेतकरी कर्ज वितरण सुलभता व कृषी योजनांची कार्यक्षमतापूर्ण अंमलबजावणी करणे होय. यापुढे भविष्यातील सर्व शेतकरी विषयक योजनांचा लाभ घ्यावा.असे आवाहन तहसिलदार वैशाली पाटील यांनी केले आहे.

# अधिकाऱ्यांचा सत्कार करणे आणि त्यांनी सत्कार स्वीकारणे दोन्ही गैर

## कामाला प्राधान्य दिले पाहिजे -ॲड.अजित देशमुख

बीड । प्रतिनिधी

जनता नवीन आलेल्या अधिकाऱ्यांचा सत्कार करते. प्रतिनिधिक स्वरूपात एखादा दुसरा सत्कार होण्यास हरकत नाही. मात्र शेकडो सत्कार करणं आणि शेकडो सत्कार स्वीकारणे, हे चुकीच आहे. जनतेने आपले काम करावे आणि अधिकाऱ्यांनी आपले काम करावे, हा नियम आहे. त्यामुळे सत्कार स्वीकारणे चूक आहे तर दुसरीकडे सत्कार कोण करते, यालाही महत्त्व आहे. अलीकडच्या काळात मोठे अधिकारी आणि मोठ्या पुढार्यांसोबतचे फोटो प्रकाशित झाल्यानंतर जनतेने यावर चिंतन केले आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांचा तुम्ही देखील सत्कार करू नका, असे आवाहन जन आंदोलनाचे विश्‍वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी केले आहे.

अनेक जण सत्कार करतात. अनेकांचे सत्कार ते काय उद्योगधंदे करतात, हे माहीत असतानाही जाणीवपूर्वक स्वीकारले जातात. त्याचा समाजावर वेगळा प्रभाव पडत असतो. आम्ही प्रशासना बरोबर आहेत. प्रशासन आम्ही सांगतो ते ऐकत, अशा पद्धतीचा निरोप सत्काराच्या आणि गप्पागोष्टींच्या माध्यमातून ते समाजापर्यंत पोहोचवत असतात.

सत्कार करणारे सर्वच गैर आहेत, असे नाही. चांगले लोक देखील आहेत. पण सगळ्यांनी आपल्या भावनांना आवर घालून आपले काम करायला हवे. ग्रामीण भागातून एखादा येऊन सत्कार करत नाही. तर सत्कार करणाऱ्यांमध्ये अनेक जण लाभार्थी असतात. आणि त्यांचे फोटो नंतर काही कालांतराने गैर कारभारामुळे प्रसारित होतात. या बाबी अधिकाऱ्यांच्या दृष्टीने योग्य नाहीत.

नुकतेच बिरूदेव यांनी आय.ए.एस. परीक्षा पास झाल्यानंतर मित्रमंडळी आणि जनतेला आवाहन केले की, त्यांनी सत्कारासाठी बुके आणू नये. बुक आणावे. ही बाब अधिकाऱ्यांनी लक्षात घेतली पाहिजे. आपल्या सत्कारासाठी कोण आले, त्यांचे धंदे काय आणि त्याच बरोबर त्यांनी आजपर्यंत काही गैरव्यवहार केलेला आहे का ? याची चाचपणी संबंधित अधिकाऱ्याने नंतर केली पाहिजे. त्या गैर कारभारावर आळा घातला पाहिजे. मात्र असे होत नाही.

बीड जिल्ह्यातील प्रशासन जनतेसाठीचे राहिलेले नाही, हे अनेक वेळा दिसून येते. पुढारी आणि अधिकारी यांचे संगणमत झाल्याने अनेक मोठमोठे घोटाळे बीड जिल्ह्यात झालेले आहेत. आमच्यामुळे अनेक घोटाळ्यात कारवाई झाली. अनेक घोटाळे आम्ही हाणून पाडले. नूतन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या संदर्भातली ◀◀ पान २ वर

# युपीएससीत यश मिळविलेल्या अक्षयचा भगवानबाबा विद्यालय पांगरी कॅंप येथे सत्कार

परळी । प्रतिनिधी



पांगरी कॅंप येथील श्री संत भगवानबाबा प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाचा माजी विद्यार्थी अक्षय मुंडे याने यूपीएससीची परीक्षेत ६९९ रॅंक घेत मिळवले यश मिळविल्याबद्दल शाळेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष फुलचंदराव कराड यांच्या मार्गदर्शनाखाली सत्कार करण्यात आला.

अक्षय च्या घरची परिस्थिती अत्यंत बेताची.त्यात वडिलांचे छत्र बालपणीच हरवलेले अशा प्रतिकुल परिस्थितीत परळी तालुक्यातील पांगरी चा अक्षय संभाजी मुंडे हा गावातील संत भगवानबाबा विद्यालयातून दहावी उत्तीर्ण झाला. बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर त्याने बीडीएस ही वैद्यकीय शाखेची पदवी घेतली.आपल्या आईचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी स्पर्धा परीक्षांसाठी तयारी सुरू केली.

पुणे येथून दोन वर्षांपूर्वी तो नवी दिल्ली येथे गेला व स्पर्धा परीक्षांसाठी त्या ठिकाणी योग्य असे मार्गदर्शन मिळवत त्याने प्रचंड मेहनत सुरू ठेवली. यूपीएससीच्या परीक्षेत त्याने ६९९ वी रॅंक मिळवत विजयाची माळ खेचून आणली. त्याच्या ह्या उत्तुंग यशाबद्दल त्याचा श्री संत भगवानबाबा प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात शुक्रवार दि.२५ एप्रिल रोजी सत्कार करण्यात आला.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय कोपनर,शिक्षक रंगनाथ घुले,सुर्यकांत होळंबे,संदीपान कांदे,विष्णु मुंडे, गोविंद कराड,सुरेश मुंडे, बालासाहेब जोगदंड,नाथराव केंद्रे,संभाजी केंद्रे,भाऊसाहेब मुंडे,सचिन पवार,सिध्दार्थ बनसोडे,रघुनाथ चप्पे,धनराज चाटे,धम्मपाल रोडे,रुक्मिण शेप,बापु मुंडे,सचिन बारगजे आदी उपस्थित होते.



# कोडींग कोर्स गुणवत्ताधारक डॉ. विठ्ठल जाधव सन्मानित

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

साहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव यांना अमेझॉन फ्यूचर इंजिनिअर या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमार्फत आयोजित कोडींग कोर्समध्ये गुणवत्ता धारण केल्याने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्या हस्ते दि.२४ एप्रिल रोजी जिल्हा परिषद सभागृह, बीड येथे लॅपटॉप भेट देऊन गौरविण्यात आले. यावेळी शिक्षणाधिकारी भगवान फुलारी, श्रीकिसन देशमुख, प्राचार्य विक्रम सारूक यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिक्षण व्यवस्थेत नवीन तंत्रज्ञानाचा ◀◀ पान २ वर

# बडतर्फ पोलीस उप निरीक्षक कासले प्रकरणाची बसली झळ

## सायबर सेलचे पोलीस निरीक्षक गात यांची बदली; नियंत्रण कक्षात केले संलग्न

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातील सायबर पोलीस ठाण्यात कार्यरत असताना पोलीस खात्याची प्रतिमा मलिन करणारे व माणुसकीला काळीमा फासणारे कृत्य केल्याप्रकरणी पोलिस उपनिरीक्षक रणजीत कासले याला बडतर्फ करण्यात आले. कासले प्रकरणाची झळ पोलीस निरीक्षक डी.बी. गात यांना बसली आहे.

बीड येथील सायबर पोलिस ठाण्याला कार्यरत असलेले डी. बी. गात यांची तडकाफडकी बदली करण्यात आली असून त्यांना पोलीस नियंत्रण कक्षात संलग्न करण्यात आले आहे. गात यांची बदली म्हणजे 'चोर सोडून संन्याशाला फाशी' असा प्रकार घडला आहे. चांगल्या अधिकाऱ्याला निष्कारण त्रास झाल्याची चर्चा होत आहे.



या संदर्भात माहिती की, सायबर पोलीस ठाण्यात कार्यरत पोलीस उपनिरीक्षक रणजीत कासले यांच्या कारनाम्यामुळे पोलीस खाते हादरून गेले. कासले याने चक्क गुजरातमध्ये जाऊन मोठी रक्कम वसूल केली. जिल्ह्यातील अनेक लोकांकडूनही मोठ्या रखमा उकडल्या. अतिरिक्त पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक यांच्यासह उपमुख्यमंत्री आणि मुख्यमंत्री यांच्यावर निष्कारण बिनबुडाचे ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# सतरा वर्षाच्या मुलीला शेतात नेऊन केला घात, विश्वासातल्या माणसानं केलं कृत्य, दोनदा लैंगिक अत्याचार

**पुणे । प्रतिनिधी**

शिक्षणाचं माहेरघर आणि सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळख असलेल्या पुणे शहरामध्ये महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवरती आला आहे. पुण्यातील खेड तालुक्यातील मांजरेवाडी या गावातील अल्पवयीन १२ वी मध्ये शिकणाऱ्या १७ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. नराधमाने त्या अल्पवयीन मुलीला शेतात नेत तिच्यावरती दोन वेळा लैंगिक अत्याचार करून तिचा निर्घृण खून केल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. या घटनेनंतर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी पीडितेच्या कुटुंबीयांशी व गावकऱ्यांशी संवाद साधला.

या घटनेने संताप व्यक्त होत आहे, तर एका घटनेने पुन्हा एकदा महिला, अल्पवयीन मुली यांच्या सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. या घटनेबाबत माहिती देताना रूपाली चाकणकर यांनी खेड तालुक्यातील अशा घटना घडू नयेत म्हणून सोमवार पासून



शाळेतील मुलीसोबत संभाषण करण्याच्या सूचना बिट मार्शल दामिनी पथकाला दिल्याची माहिती दिली आहे. त्याचबरोबर खेड तालुक्यात १७ वर्षीय तरुणीवर हा प्रसंग घडला हा वेदनादायी आहे. आरोपीला अटक केली आहे , पोलिसांनी तपास चांगला केला आहे. आज पीडित मुलीच्या कुटुंबाची भेट घेतली असल्याची देखील त्यांनी माहिती दिली आहे.

आरोपीचे चार्टसीट तात्काळ दाखल करून गुन्हा फास्ट ट्रॅकवर घेऊन आरोपीला फाशीच्या शिक्षेपर्यंत पोहोचवू असा विश्वास देखील त्यांनी यावेळी व्यक्त केला आहे. समाजात असे नराधम जगूच नये, ही विकृती आहे. त्याच्या विरोधात आपली लढाई आहे. खेड तालुक्यातील अशा घटना घडू नयेत म्हणून सोमवार पासून शाळेतील मुलीसोबत संभाषण करण्याच्या सूचना बिट मार्शल दामिनी पथकाला दिल्या आहे. आरोपी व्यक्ती ही ओळखीची व्यक्ती आहे आणि समाजामध्ये ९० टक्के हे ओळखीच्या लोकांकडून अन्याय अत्याचार होत आहे, त्यामुळे ओळखीच्या लोकांवर सुद्धा विश्वास ठेवू नये असं आवाहन रूपाली चाकणकरांनी यावेळी केलं आहे.

मुलींना भिती वाटते. ती वाटू नये यासाठी त्यांच्या सोबत दामिनी पथक बोलणे करून तपासणी करतील असंही त्या म्हणाल्या. मुली आणि महिलांच्या सुरक्षिततेसाठी पोलिसांना तात्काळ कारवाई करण्याच्या सूचना दिल्याचंही त्यांनी सांगितलं.

## रूपाली चाकणकरांची सोशल मिडिया पोस्ट

मांजरेवाडी ता. खेड, जि. पुणे येथे घडलेल्या अत्यंत हृदयद्रावक व संतापजनक घटनेमुळे मन सुन्न झाले आहे. गावातील अल्पवयीन १२ वी मध्ये शिकणाऱ्या मुलीवर नराधम नवनाथ मांजरे याने शेतात दोन वेळा लैंगिक अत्याचार करून तिचा निर्घृण खून केला. या अमानुष कृत्याचा तीव्र निषेध करत आज मी स्वतः गावाला भेट देऊन पीडितेच्या कुटुंबीयांशी व गावकऱ्यांशी संवाद साधला.

# आंबेगाव-शिरूर मतदारसंघातशेतीला शाश्वत पाणी मिळण्यासाठी पाच वर्षाचा शास्त्रीय पद्धतीने आराखडा तयार करा : दिलीप वळसे पाटील

**मंचर । प्रतिनिधी**

आंबेगाव_शिरूर विधानसभा मतदारसंघातील वेळ नदी,घोड नदी व भीमा खोरेयाचा भूशास्त्रीय अभ्यास करून पाणलोट क्षेत्र विकासाला गती द्यावी. त्यासाठीआदिवासी भाग, मध्य ,पूर्व भाग व पाबळ परिसर असे चार विभाग करावेत. पावसाचे पडणारे पाणी शिवारात आडले व मुरले पाहिजे. शेतीला शाश्वत पाणी मिळाले पाहिजे .त्या दृष्टीने येत्या पाच वर्षाचा अभ्यासपूर्णआराखडा तयार करावा अशा सूचना माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी दिल्या.

पुणे येथे शुक्रवारी (ता.२५)जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत शेतीला शाश्वत पाणी मिळण्यासाठी आवश्यक उपाययोजना या संदर्भात वळसे पाटील बोलत होते. याप्रसंगी मृद व जलसंधारण विभागाच्या



कार्यकारी अभियंता सुजाता हांडे, हुतात्मा बाबू गेनू सागर(डिंभे धरण) कार्यकारी अभियंता प्रशांत कडूसकर, डॉ सुमंत पांडे डॉ संजय पाटील डॉ एस एम पडघमकर गौरव बोरकर यांच्यासह अनेक शास्त्रज्ञ व अधिकारी उपस्थित होते. सुरुवातीला डॉ पांडे यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी आंबेगाव शिरूर विधानसभा मतदारसंघातील भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करून सद्यस्थितीत शाश्वत पाणी उपलब्ध होण्यासाठीसुचवलेल्या उपाययोजनांचे सादरीकरण केले.

आंबेगाव शिरूर विधानसभा मतदारसंघातीलप्रत्येक गावाला शाश्वत पाणी मिळाले पाहिजे. त्यासाठी गावनिहाय माहिती संकलित करा. या कामासाठी अटल भूजल ,कृषी विभाग नरेगा जलसंधारण व जिल्हा नियोजन समिती यामधून निधी दिला जाईल. मे महिन्यात दर्जेदार कामे झाली पाहिजेत. त्यादृष्टीने गतिमान पद्धतीने संबंधित सर्व यंत्रणांनीकाम करावे.

# पहलगाम हल्ल्याचा एनआयकडून तपास सुरु, पुण्यातील जगदाळे आणि गनबोटे कुटुंबाची घेतली भेट

**पुणे । प्रतिनिधी**

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पुण्यातील संतोष जगदाळे आणि कौस्तुभ गनबोटे यांच्या घरी राष्ट्रीय तपास यंत्रणेचे (एन आय ए) पथककाने भेट दिली. त्यांच्याकडून संपूर्ण घटनेबाबत माहिती घेतली आहे.

दोन्ही कुटुंबियांचे जबाब नोंदविले आहेत. पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा तपास एनआयए कडून सुरू आहे. एनआयए च्या पथकांकडून कालपासूनन पहलगाम हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या महाराष्ट्रातील पीडित कुटुंबीयांच्या घरी जाऊन जबाब नोंदवण्याचे काम सुरू आहे.

दहशवादी हल्ल्याचा पूर्ण घटनाक्रमाचा जबाब एनआयए चे अधिकारी नोंदवला आहे. महाराष्ट्रातील ६ जण या हल्ल्यात मृत्यूमुखी पडले. महाराष्ट्रातील पीडित




कुटुंबीयांच्या घरी जाऊन जबाब नोंदवण्याचे काम सुरू आहे.

दहशवादी हल्ल्याचा पूर्ण घटनाक्रमाचा जबाब एनआयए चे अधिकारी नोंदवणार आहेत. महाराष्ट्रातील ६ जण या हल्ल्यात मृत्यूमुखी पडले. यात पुण्यातील २ जण, पनवेलमधील १ जण आणि डोंबिवलीतील ३ मावस भावंडांचा समावेश आहे.

जम्मू आणि काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाममधील बैसरन येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ नागरिकांचा मृत्यू झाल्यानंतर, सुरक्षा यंत्रणांनी बुधवारी हल्ल्यात सहभागी असलेल्या संशयित दहशतवाद्यांचे तीन रेखाचित्रे जारी केली. यानंतर सुरक्षा दलांनी शुक्रवारी सकाळी दोन दहशतवाद्यांची घरे उध्वस्त केली.

# आसामच्या तरुणीची पुण्यात कुंटणखान्यात ५ लाखांत विक्री ; पोलीस कर्मचाऱ्याने केला अत्याचार

**पुणे । प्रतिनिधी**

आसाम राज्यातील एका तरुणीला विवाहाच्या आमिषाने पुण्यात आणून तिची बुधवार पेठेतील कुंटणखान्यात पाच लाख रुपयात विक्री करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. धक्कादायकदायक म्हणजे, फरासखाना पोलीस ठाण्याच्या तपास पथकातील कर्मचाऱ्याने शारीरिक संबंध प्रस्थापित केले आहेत. विषय म्हणजे, नागरिकांनी आंदोलन केल्यानंतर याप्रकरणी पोलीस कारवाई झाली आहे. याप्रकरणी २५ वर्षीय पीडित तरुणीने फरासखाना पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार शफीऊल आबुल नसूर वाहीद आलम (रा. आसाम), पापा शेख, अधुरा शिवा कामली (दोघे रा. बुधवार पेठ), तसेच एका अनोळखी पोलीस कर्मचाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी शफीऊल मूळचा आसाममधील आहे. त्याने जानेवारी महिन्यात विवाहाचे आमिष दाखवून पीडित तरुणीला आसाममधून पळवून आणले. त्याने बुधवार पेठेतील कुंटणखान्यात ५ लाख रुपयात तरुणीची विक्री केली. तरुणीला धमकावून दलाल पापा शेख, अधुरा कामली यांनी तिला वेश्याव्यवसायास प्रवृत्त केले. आरोपींच्या ओळखीतील एका पोलीस कर्मचाऱ्याने तरुणीवर अत्याचार केले. गेले चार महिने हा प्रकार सुरू होता. पीडित तरुणीने त्यांच्या तावडीतून सुटका करुन घेतली आणि पोलिसांकडे तक्रार दिली. आरोपींविरुद्ध अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायद्यान्वये (पीटा) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अजित जाधव तपास करत आहेत.


# बारामतीतील यात्रा-जत्रेतील खाणं भोवलं ; १५ वर्षीय मुलाला जीबीएसची लागण

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती शहरातील कसबा परिसरातील एका १५ वर्षीय युवकास 'जीबीएस' आजाराची लागण झाली आहे. त्याला शुक्रवारी (दि.२५) पुणे शहरात उपचारासाठी दाखल करण्यात आले. अतिदक्षता विभागात त्याच्यावर उपचार सुरु आहेत.

सध्या बारामती तालुक्यात यात्रा-जत्रा सुरु आहेत. या युवकाचे ग्रामीण भागातील जत्रांमधून फिरणे झाले होते. त्या ठिकाणी त्याने काही पदार्थ खाल्ले होते, अशी माहिती संबंधित युवकाच्या कुटुंबियांनी दिल्याचे उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. महेश जगताप यांनी सांगितले. याबाबत सिल्व्हर ज्युबिली रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. महेश जगताप यांनी सांगितले की, कसब्यातील १५ वर्षीय मुलाला गुरुवारी (दि. २४) सकाळी अशक्तपणा जाणवू लागला. शिवाय त्याला उठता येत नव्हते. त्याला घेवून त्याचे पालक कसबा येथील खासगी डॉक्टरांकडे गेले. तपासणीनंतर पुढील उपचारासाठी या मुलाला भाग्यजय हॉस्पिटलच्या डॉ. आर. डी. वाबळे यांच्याकडे दाखल करण्यात आले.

या ठिकाणी मेंदूविकार तज्ज्ञ डॉ. सुयोग दोशी यांनी हा मुलगा संशयित 'जीबीएस' रुग्ण असल्याने




त्याला उपचारासाठी पुण्याला पाठविले. त्याच्यावर पुणे शहरातील काशीबाई नवले हॉस्पिटलमध्ये अतिदक्षता विभागात उपचार सुरु असून कृत्रिम श्वसन यंत्रणेवर त्याला ठेवण्यात आले आहे. याबाबत तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मनोज खोमणे यांच्याशी चर्चा झाली आहे. हा मुलगा वास्तव्यास असलेल्या परिसराचे तातडीने सर्व्हेक्षण करुन संशयित रुग्णांची उपजिल्हा रुग्णालयात तपासणी केली जाईल. लक्षणे आढळल्यास उपचार करण्यात येतील. गंभीर रुग्ण आढळल्यास पुणे शहरात उपचारास पाठविण्याची शिफारस करण्यात येईल. या मुलाचे वडील दिव्यांग शेतकरी आहेत. सध्या त्यांना मुलाच्या उपचारासाठी आर्थिक मदतीची गरज आहे. या रुग्णाची 'हिस्ट्री' तपासणार असल्याचे आरोग्य विभागाच्या वतीने सांगण्यात आले.

# तथ्य दडवून ठेवत पोटगी मागणाऱ्या पत्नीचा अर्ज न्यायालयाने खर्चासहित फेटाळला

**पुणे । प्रतिनिधी**

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्याच्या तरतुदींनुसार उस्मानाबाद येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने पाच हजार रुपयांची अंतरिम पोटगी मंजूर केली असल्याची बाब लपवून ठेवत पुण्याच्या कौटुंबिक न्यायालयात पंचवीस हजार रुपयांच्या अंतरिम पोटगीसाठी धाव घेतलेल्या पत्नीचा अर्ज न्यायाधीशांनी खर्चासहित फेटाळला.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार 'फोरम शॉपिंग'ला मनाई आहे. या प्रकरणात अंतरिम पोटगी मिळत असतानाही, पतीचे उत्पन्न अनेक पटींनी वाढले किंवा त्याला अतिरिक्त उत्पन्न मिळते, याचा नवा पुरावा पत्नीने सादर केलेला नाही. परिणामी हा दावा कायदेशीर म्हणता येणार नाही, असे स्पष्टपणे नमूद करत कौटुंबिक न्यायाधीश एस. एन. रुक्मे यांनी हा आदेश दिला.

या प्रकरणात पतीने पत्नीपासून घटस्फोट देण्याच्या मागणीसाठी हिंदू विवाह कायद्याच्या कलम १३ नुसार, पुण्याच्या कौटुंबिक न्यायालयात अर्ज केला आहे. त्यावर पत्नीने



कौटुंबिक हिंसाराचारापासून महिलांचे संरक्षण कायद्यानुसार उस्मानाबाद येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात पतीविरोधात दावा दाखल केला. त्यामध्ये तिला दरमहा पाच हजार रुपयांची पोटगी मंजूर झाली. त्यानंतर पत्नीने पुण्याच्या कौटुंबिक न्यायालयात २५ हजार रुपयांची अंतरिम पोटगी मिळण्यासाठी दावा दाखल केला.

पती बँकर असून, त्याला दोन लाख रुपये पगार आहे. त्याच्या आईवडिलांची खासगी कंपनी असून, त्यातून त्यांना दरमहा २५ लाख रुपये उत्पन्न मिळते. पत्नीला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. पती दैनंदिन खर्च व जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी पैसे देत नाही, असे पत्नीने अर्जात म्हटले होते.

त्याला पतीचे वकील ॲड. मयूर साळुंके, ॲड. अजिंक्य साळुंके, ॲड. अमोल खोब्रागडे यांनी विरोध केला. पत्नीला आधीच पाच हजार रुपये अंतरिम पोटगी मंजूर आहे. पत्नी खासगी व्यावसायिक असून, दरमहा चाळीस हजार रुपये कमावते.

पत्नीने पतीच्या उत्पन्नाबाबत अतिशयोक्तीपूर्ण दावा केला असून, त्याच्या नावे एवढ्या संपत्तीच्या नोंदी नाहीत, असे पतीच्या वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यावर न्यायालयाने पत्नीचा अर्ज खर्चासहित फेटाळला.

# फुले स्मारकाच्या भूसंपादनासाठी समिती स्थापन

**पुणे । प्रतिनिधी**

महात्मा फुले राष्ट्रीय स्मारकासाठीची जागा ताब्यात घेण्यात महापालिकेला यश आलेले नाही. त्यामुळे आता उपायुक्त अविनाश सकपाळ यांच्या अध्यक्षतेखाली १४ अभियंत्यांची समिती गठित करण्यात आली आहे. ही समिती या भागातील जागा मालक, भाडेकरू यांच्याशी चर्चा करून भूसंपादनाची प्रक्रिया पार पाडणार आहेत.

महात्मा फुले पेठ येतील महात्मा फुले वाडा स्मारक, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारक यांचे एकत्रीकरण केले जाणार आहे. या स्मारकासाठी आवश्यक असलेल्या जागा ताब्यात घेण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. त्यासाठी आरक्षणात बदल करण्याचा निर्णय होऊन सुमारे दीड वर्ष उलटून गेले आहे.

पण महापालिकेने भूसंपादनाची कार्यवाही सुरु केली नव्हती. काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भर कार्यक्रमात महापालिकेच्या या कार्यपद्धतीवर टीका करत नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर प्रशासन कामाला लागले आहे.

या दोन स्मारकाचे एकत्रीकरण करताना पाच हजार ३१० चौरस मीटरची जागा ताब्यात घ्यावी लागणार आहे. त्यामध्ये निवासी व व्यावसायिक अशा एकूण ९१ मिळकती आहेत. यामध्ये ५१६ मालक आणि २८५ भाडेकरू आहेत. प्रशासनाने या सर्वांशी चर्चा करून त्यांच्या जागा ताब्यात घेण्याची प्रकिया करणे आवश्यक होते. यामध्ये बराच कालावधी गेल्याने या ठिकाणी पुन्हा एकदा सर्वेक्षण केले जाणार आहे. जागा मालकांशी बोलून त्यांना कोणत्या स्वरूपात जागेचा मोबदला हवा आहे याची नोंद घेतली जाणार आहे. पण यासाठी महापालिकेच्या सेवेतील उपायुक्त दर्जाचा अधिकारी नियुक्त करून त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी आदेश काढले आहेत.

सपकाळ यांच्या समितीमध्ये भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालयाचे सहय्यक आयुक्त, भूसंपादन व व्यवस्थापन विभाग, बांधकाम, भवन रचना याविभागाच्या १२ उप अभियंता व कनिष्ठ अभियंत्यांचा समावेश करण्यात आला आहे.

समितीने करावयाची कामे

भूसंपादन केल्या जाणाऱ्या जमिनीचे पुन्हा एकदा सर्वेक्षण करणे – विस्थापित होणाऱ्या नागरिकांच्या बैठका घेऊन त्यांचे समुपदेशन करणे – भूसंपादन केल्यानंतर जागा मालकांना एफएसआय, टीडीआर, रोख रक्कम यापैकी कोणत्या स्वरूपात मोबदला पाहिजे याची माहिती संकलित करणे – ही माहिती संकलित केल्यानंतर भूसंपादनासाठी आयुक्त, स्थायी समिती, मुख्यसभेच्या मान्यतेसाठी प्रस्ताव ठेवून, मान्यतेनंतर त्याची अंमलबजावणी करणे

# विकासकामांचा दर्जा राखण्यासाठी ठोस निर्णय; आमदार शेळके यांची आग्रही भूमिका

**वडगाव मावळ । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील विकासकामांचा दर्जा अबाधित राहावा यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या आज (दि.२५) पार पडलेल्या बैठकीत ठोस निर्णय घेण्यात आले. या बैठकीत मावळचे आमदार सुनील शेळके यांनी कामांच्या गुणवत्तेबाबत जोरदार भूमिका मांडत, दर्जामान्य विकासासाठी उपाययोजना राबवण्याचा आग्रह धरला. या मुद्द्यावर त्यांनी यापूर्वीही विधानसभेत आवाज उठवला होता. जिल्ह्याचे पालकमंत्री व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी सुमारे १३७९ कोटी रुपयांचा विकास आराखडा सादर करण्यात आला. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत विविध महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले, त्यात विकासकामांच्या गुणवत्तेसाठी विशेष भर देण्यात आला.

या बैठकीमध्ये काही महत्त्वाचे निर्णय



घेण्यात आले आहेत. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीमध्ये जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत १५ लाख रुपयांपेक्षा अधिक निधीच्या कामांनाच मंजुरी देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचबरोबर कामांची गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी थर्ड पार्टी ऑडिट एजन्सी नेमण्याचे ठरवण्यात आले आहे. व्यायामशाळा व क्रीडा साहित्य खरेदीसाठी गुणवत्तानियंत्रणाचे नियम उद्धउ मार्फत लागू करण्यात येणार आहेत. सर्व नवीन शासकीय इमारतींवर सौर पॅनेल बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच, विद्युत अडचणी असलेल्या ठिकाणी नवीन पाणीपुरवठा योजना सौर उर्जेवर आधारित असतील.जिल्हा परिषदेच्या वर्गखोल्या आणि अंगणवाडी इमारतींसाठी एकसंध टाईप प्लॅन तयार करून त्यासाठी वाढीव निधी मंजूर करण्यात येणार आहे, असे निर्णय घेण्यात आले आहेत.

राजकीय बातम्या वाचण्यासाठी क्लिक करा

त्याचबरोबर कामांचे बिल तयार करताना पूर्वीप्रमाणे फोटो अपलोड करणे तर आवश्यक आहेच, पण आता ३० सेकंदांची व्हिडीओ क्लिप अपलोड करणेही बंधनकारक करण्यात येणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जिल्हा परिषद बांधकाम विभाग यांनी कामाचे अंदाजपत्रक प्रत्यक्ष स्थळ पाहूनच तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विद्युत विभागाने दर्जेदार व वेळेत कामे पूर्ण करावीत, तसेच मागील अपूर्ण कामांची चौकशी करण्याची मागणी बैठकीत झाली. वन विभागाने स्थानिकांच्या गरजा लक्षात घेऊन आधीपासून अस्तित्वात असलेल्या रस्त्यांच्या कामात अडथळा आणू नये, अशा स्पष्ट सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या. या निर्णयांमुळे पुणे जिल्ह्यातील विकासकामांमध्ये पारदर्शकता, गुणवत्ता आणि वेळेच्या बंधनाचे पालन सुनिश्चित होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. आमदार सुनील शेळके यांच्या दर्जाबाबत घेतलेल्या ठाम भूमिकेमुळेच या विषयावर लक्ष केंद्रीत झाले असून, येत्या काळात कामांच्या गुणवत्तेत निश्चितच सुधारणा होईल, अशी अपेक्षा आहे.

# देवेंद्र फडणवीसांना 'या' विषयावर पुस्तक लिहायला लावणार; पुण्यात अजितदादांची

**पुणे । प्रतिनिधी**

२०१९ मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी 'मी पुन्हा येईन'चा नारा दिला होता. त्यानंतर महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर फडणवीस यांनी 'मी पुन्हा अडीच वर्षांनी आलो, दोन पक्ष फोडूनच आलो', असे वक्तव्य केले होते. त्यांच्या या वक्तव्याची त्यावेळी जोरदार चर्चा झाली होती. आता मुख्यमंत्री फडणवीस यांच्या या घोषणेवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यातील एका कार्यक्रमात जोरदार फटकेबाजी केली.

'मी पुन्हा येईन, मी पुन्हा येईन' हे पुस्तक मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहायला लावणार आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे. पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात 'ऐकलत का?' या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या कार्यक्रमात अजित पवार यांनी काही जुने किस्से सांगितले. त्यात त्यांनी 'मी पुन्हा येईन' या फडणवीसांच्या घोषणेचाही उल्लेख केला.

अजित पवार यांनी एक जुना किस्सा सांगितला. 'मी भाषण करायला उठलो. पण घाम फुटला होता. पण मी म्हटले साहेब एवढे बोलतात आपण बोलू.



काय व्हायच ते होऊ दे, नंतर तुम्ही आजपर्यंत मला पाहत आहात. भाषण टाळ्यांसाठी नको. तर ते मनाचा ठाव घेणारे हवे,' असे अजित पवार म्हणाले.

पवार कुटुंब एकत्र यावे, फुटाणेंची दादांना साद

यावेळी बोलताना कवी, लेखक रामदास फुटाणे म्हणाले की, पवार कुटुंब आणि ठाकरे कुटुंब यांच्या भोवती महाराष्ट्राचे राजकारण फिरत आहे. हे दोन्ही कुटुंब एकत्र यावीत, ही महाराष्ट्राची इच्छा आहे. दादा खूप काम करतात, दादा अशीच वेळ साहित्य संमेलनालादेखील द्यावी. साहित्य संमेलनाच्या कार्यक्रमातदेखील येत जावे. राजकारण तर काय रोजचे आहे, अशी साद कवी रामदास फुटाणे यांनी त्यांच्या भाषणातून दादांना घातली.